सोमवार, १५ नोव्हेंबर २०२१


◆ वर्ष १४ ◆ अंक ११८

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांची प्रकृती चिंताजनक



**पुणे** : आपल्या ओजस्वी वाणीने शिवचरित्र घराघरांत पोहचविणारे, 'राजा शिवछत्रपती' या ग्रंथाचे लेखक आणि 'जाणता राजा' या महानाट्याचे लेखक-दिग्दर्शक शिवशाहीर महाराष्ट्रभूषण बळवंत मोरेश्वर ऊर्फ बाबासाहेब पुरंदरे यांची प्रकृती चिंताजनक बनली आहे. नुकतीच वयाची शंभरी पार केलेल्या बाबासाहेबांना मागील काही दिवसांपासून पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दाखल करण्यात आलेले आहे. त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून ते व्हेंटिलेटरवर आहेत. 'बाबासाहेब पुरंदरे यांना न्यूमोनिया होऊन वृद्धापकाळाने ते गेल्या आठवडाभरापासून दीनानाथ मंगेशकर रुग्णालयामध्ये दाखल आहेत. त्यांची प्रकृती खूप खालावलेली आहे,' अशी माहिती या रुग्णालयाचे जनसंपर्क अधिकारी शिरीष याडकीकर यांनी प्रसारमाध्यमांना दिली.

### अंतरंग

'बाळासाहेबांच्या आत्म्याला किती यातना होत असतील'/२

पालीकरांवर अघोषित पाणीटंचाईचे संकट/५

कामोठ्यातील मॅरेथॉनला स्पर्धकांचा उदंड प्रतिसाद/६

# एसटी कामगारांच्या आत्महत्यांना रक्तपिपासू आघाडी सरकारच जबाबदार

## भाजप नेते आशिष शेलार यांचा हल्लाबोल

**मुंबई : प्रतिनिधी**



राज्यात गेल्या सहा महिन्यांत जवळपास ४० एसटी कामगारांनी आत्महत्या केल्या आहेत. या आत्महत्यांना राज्यातील रक्तपिपासू आघाडी सरकारच जबाबदार आहे, असा आरोप भाजप नेते आमदार आशिष शेलार यांनी केला आहे. त्यांनी रविवारी (दि. १४) आंदोलक एसटी कामगारांची आझाद मैदानात जाऊन भेट घेतली. त्या वेळी त्यांनी आघाडी सरकारवर हल्लाबोल केला. माजी मंत्री सदाभाऊ खोत, आमदार गोपीचंद पडळकर उपस्थित होते.

एसटीचे राज्य शासनात विलिनीकरण, सहाव्या वेतन आयोगासह इतर मागण्यांसाठी कर्मचाऱ्यांचे आंदोलन सुरू आहे. या मागण्या मान्य करा. विलिनीकरणासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करा आणि एसटी कामगार जगवा, असे आवाहन शेलार यांनी केले. शासकीय कर्मचाऱ्यांना जे फायदे मिळतात, ओळख मिळते ती द्या एवढीच कामगारांची मागणी आहे. यासाठी केवळ एक वाक्याचा जीआर काढायचा आहे. राज्य सरकारला सर्व सहकार्य करू, पण नाही केलेत तर आम्ही परत येतोय हे लक्षात ठेवा. ही लढाई केवळ एसटी कामगारांची नाही, तर महाराष्ट्रातील गोरगरीब, दलित, पीडित, वंचित समाजाला न्याय देण्याची आहे, असेही त्यांनी सांगितले. **(पान २ वर..)**

## एसटी संपादरम्यान महिला कर्मचाऱ्यांचा आत्मदहनाचा प्रयत्न

**मुंबईतील घटना**

**मुंबई** : गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेला एसटी कर्मचाऱ्यांचा संप तीव्र बनत चालला आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर तोडगा निघत नसल्याने मुंबईत काही संपकरी महिला कर्मचाऱ्यांनी रविवारी (दि. १४) आपल्या अंगावर रॉकेल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. पोलिसांनी या महिलांना वेळीच रोखल्याने पुढचा अनर्थ टळला.

एसटी महामंडळाचे राज्य सरकारमध्ये विलिनीकरण करण्याची या आंदोलनकर्त्या कर्मचाऱ्यांची प्रमुख मागणी आहे. गेल्या आठ दिवसांपासून एसटी कर्मचाऱ्यांचा हा संप सुरू आहे. यावर काहीच तोडगा निघत नसल्याने आंदोलनकर्त्यांची उद्विग्नता वाढत चालली आहे.

(अधिक छायाचित्रे पान ६ वर..)




# जीवनात शिक्षण महत्त्वाचे

## केंद्रीय राज्यमंत्री नारायणस्वामींचे प्रतिपादन

**एसजीटी इंटरनॅशनल स्कूलचे उद्घाटन**

**पनवेल : प्रतिनिधी**

जीवनात शिक्षण अतिशय महत्त्वाचे आहे. शिक्षणामुळे केवळ ज्ञानच मिळते असे नव्हे; तर जगण्याचे मार्गही उलगडतात, असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री ए. नारायणस्वामी यांनी रविवारी (दि. १४) कामोठे येथे केले. कामोठे येथील नौपाडा, तसेच चिंचपाडा येथे एसजीटी इंटरनॅशनल स्कूल सुरू झाले आहे. या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्कूलचे उद्घाटन मंत्री ए. नारायणस्वामी यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाला भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, भाजप पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, महापालिका स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, नगरसेवक विजय चिपळेकर, गोपीनाथ भगत, नगरसेविका अरुणा भगत, कुसूम म्हात्रे, संतोषी तुपे, भाजप भटके विमुक्त महिला आघाडी अध्यक्ष विद्या तामखेडे, महिला मोर्चा कामोठे अध्यक्ष वनिता पाटील, भाजप नेते विनोद साबळे, कर्णा शेलार, हॅप्पी सिंग, मनीषा वनवे, शशिकांत भगत, आयआरएएस सुनील वरे, मुंबई विद्यापीठाचे बी. एन. गायकवाड, पनवेल महापालिकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी एस. एस. धुपे, कार्यक्रमाचे आयोजक तथा एसजीटी इंटरनॅशनल स्कूलचे चेअरमन रमेश तुपे, सेक्रेटरी शुभम तुपे, सचिन अवले, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

मंत्री ए. नारायणस्वामी यांनी सुरुवातीलाच आपण आमदार प्रशांत ठाकूर यांच्या भाषणाने प्रभावित झालो असल्याचे सांगितले, तसेच रमेश तुपे यांचे शैक्षणिक कार्य मोलाचे आहे, असे नमूद केले. **(पान २ वर..)**

### आपला देश बदलतोय -आमदार प्रशांत ठाकूर

*आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात, पूर्वी बहुतांशी सिनेकलावंतांना पद्म पुरस्कार दिले जात होते, पण आज लोकांमध्ये जाऊन लोकांसाठी काम करणाऱ्यांना पुरस्कार मिळतोय हे बघून आपला देश बदलताना दिसतोय असे सांगून यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार व्यक्त केले आणि त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ए. नारायणस्वामी यांचे विशेषत्वाने आभार मानले.*



**पनवेल : भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष तथा नगरसेवक विक्रांत पाटील यांच्या जनसेवा कार्यालयाचे उद्घाटन रविवारी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी रायगडचे माजी पालकमंत्री तथा विद्यमान आमदार रवींद्र चव्हाण, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर आदी उपस्थित होते.** (वृत्त उद्याच्या अंकात.)

## निवडक

### बिहारमध्ये नक्षलवाद्यांकडून एकाच कुटुंबातील चौघांची हत्या



**गया** : बिहारच्या गया जिल्ह्यातील मोनबार गावात नक्षलवाद्यांनी हल्ला करून एकाच कुटुंबातील चार जणांची हत्या केली. यानंतर नक्षलवाद्यांनी स्फोट घडवून मृतांचे घरही उडवले. नक्षलवाद्यांनी शनिवारी रात्री हा हल्ला केला. यानंतर नक्षलवाद्यांनी गावात एक पत्रकही सोडले आहे.

### 'त्रिपुरात मशिदीची नासधूस केल्याची व्हायरल पोस्ट फेक'

**नवी दिल्ली** : त्रिपुराच्या गोमती जिल्ह्यातील मशिदीमध्ये नासधूस केल्याची अफवा सोशल मीडियात पसरली आहे. वास्तविक सोशल मीडियातील पोस्टमध्ये दावा केल्याप्रमाणे कसल्याही प्रकारची नासधूस, बलात्कार, मृत्यू अथवा कुणाला जखमी करण्याची घटना त्रिपुरात घडली नाही. लोकांनी शांतता राखावी अशा प्रकारच्या चुकीच्या माहितीला बळी पडू नये, असे केंद्रीय गृहमंत्रालयाने म्हटले आहे.

## गडचिरोलीत नक्षलींकडून मोठा शस्त्रसाठा जप्त

**गडचिरोली : प्रतिनिधी**

गडचिरोली पोलीस आणि सी-६० जवानांच्या पथकाने नक्षलवाद्यांविरोधात शनिवारी केलेल्या कारवाईत मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे. या चकमकीत कमांडर मिलिंद तेलतुंबडेसह २६ नक्षली मारले गेले आहेत.

महाराष्ट्र पोलिसांनी नक्षलवाद्यांकडून मोठा शस्त्रसाठा जप्त केला आहे. त्यात एके ४७च्या पाच रायफली, एके विथ यूबीजीएल अटॅचमेंट एसएलआर नऊ, इन्सास १,३०३च्या तीन, १२ बोअरच्या नऊ बंदुका, पिस्तूल एक अशी एकूण २९ शस्त्रास्त्रे जप्त करण्यात आली आहेत.

नक्षलवाद्यांविरोधातील मोहीम सुरूच आहे. जे मृतदेह मिळालेत त्यातील काहींची ओळख पटली आहे, तर काहींची ओळख पटवणे सुरू आहे.

## 'कार्तिकी'साठी पंढरी सजली

**पंढरपूर : प्रतिनिधी**

कोरोना महामारीनंतर पहिल्यांदाच पंढरपूर येथे सोमवारी (दि. १५) कार्तिकी एकादशीचा सोहळा रंगत आहे. या पार्श्वभूमीवर सुमारे मंदिर प्रशासनाकडून पूजेची तयारी झाली आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार सपत्निक श्री विठ्ठल रुक्मिणीमातेची पूजा करणार आहेत. कार्तिक एकादशीच्या निमित्ताने सुमारे तीन लाख वारकरी पंढरपुरात आले आहेत. चंद्रभागेच्या तीरावर वारकऱ्यांनी राहुट्या उभारल्या आहेत.

## अरे शहाण्या, तू आधी मास्क वापर!

**बारामती : प्रतिनिधी**



**अजित पवारांनी रोहित पवारांना सुनावले**

'कर्जत जामखेडला काल गेलो होतो, मात्र तिकडे कोणीही मास्क वापरत नसल्याचे निदर्शनास आले. मी रोहितला म्हटले, अरे शहाण्या तू आमदार आहेस. तू आधी मास्क वापर. त्यानंतर मला बाकीच्यांना सांगता येईल,' अशा शब्दांत उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी आमदार रोहित पवार यांना सुनावले. धुमाळवाडी (ता. बारामती) येथील एका पतसंस्थेच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे म्हणाले की, कोरोना गेलेला नाही. काळजी घेणे ही सर्वांची जबाबदारी आहे. तिसरी लाट आली तर त्याची मोठी किंमत मोजावी लागेल. लसीकरण करून घ्या. टोकाची भूमिका घ्यायला लावू नका. लसीकरण वाढवण्याकरिता उपक्रम राबवा. लसीकरण झाल्यावर जरी कोरोना झाला तरी माणूस वाचतो.

मी भाषण करताना मास्क काढत नाही अन् काही जण मास्कच वापरत नाहीत. हे बरोबर नाही, असेही अजित पवार या वेळी म्हणाले.

## राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत रूपेश पावशेला सुवर्णपदक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील पैलवान रूपेश पावशे याने उत्तर प्रदेशातील आग्रा येथे झालेल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले आहे. याबद्दल त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



स्पोर्ट्स अॅण्ड फिजिकल फिटनेस बोर्ड व इंडिया युनिव्हर्सिटी यांच्या वतीने आग्रा येथे आयोजित राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी ८५ किलो वजनी गटात रूपेश पावशे याची महाराष्ट्रातून निवड झाली होती. आपली निवड सार्थ ठरवत त्याने सुवर्णपदक जिंकले.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचा पैलवान असलेला रूपेश पनवेल तालुक्यातील नितळस गावचा रहिवासी असून चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयात क्रीडा शिक्षक आहे. या कामगिरीबद्दल पैलवान रूपेशची हरियाणातील सोनिपत येथे ६ ते ८ जानेवारी २०२२ या कालावधीत होणाऱ्या आंतराराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



**पनवेल : भाजप युवा मोर्चा प्रभाग क्रमांक १चे अध्यक्ष नितेश पाटील यांच्या घोट येथील जनसंपर्क कार्यालयाचे आणि अथर्व इंटरप्राइजेसचे उद्घाटन शनिवारी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक अनिल भगत, मनोहर म्हात्रे, नितीन पाटील, प्रवीण पाटील, अमर पाटील, संतोष भोईर तसेच विनोद पाटील, दशरथ भगत, नवनाथशेठ पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.** (अधिक छायाचित्रे पान ६ वर..)

पनवेल भाजपतर्फे

जनहितार्थ

माहितीसाठी




पनवेल महानगरपालिका हद्दीत

सोमवार, दि. १५ नोव्हेंबर २०२१ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
- ३. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
- ८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
- ९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
- १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ११. टाटा अॅडव्हान्स सेंटर, खारघर
- १२. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १४. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
- १५ न्यु इंग्लिश स्कूल, कळंबोली
- १६. सेंट्रल रेल्वे, पनवेल

कोव्हॅक्सिन

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल
- ३. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.

पनवेल ग्रामीण लसीकरण

- पडघे, रा.जि.प. शाळा
- खिडूकपाडा, रा.जि.प. शाळा
- खारघर, रा.जि.प. शाळा
- कोपरा समाजमंदिर
- काळुंद्रे, रा.जि.प. शाळा
- घोट, रा.जि.प. शाळा (म्हात्रे पाडा, /गोंधळी पाडा/मढवी पाडा/वाघाची वाडी
- धामोळे पाडा, रा.जि.प. शाळा
- खुटारी/एकटपाडा, रा.जि.प. शाळा
- किरवली/आडीवली, रा.जि.प. शाळा
- धरणा, रा.जि.प. शाळा

# अब हिंदू मार नहीं खाएगा!

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांची प्रतिक्रिया

**पुणे : प्रतिनिधी**

त्रिपुरामध्ये घटना घडली की नाही हा प्रश्न आहे, पण त्यासाठी अमरावती, नांदेड, मालेगाव मध्ये अशांतता पसरवणे हे कितपत योग्य आहे. त्यामुळे अमरावतीमध्ये जे घडले ती, हिंदुंची उत्स्फूर्त प्रतिक्रिया होती. अब हिंदू मार नहीं खाएगा, अशी प्रतिक्रिया भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी दिली. पुण्यात आयोजित एका कार्यक्रमापूर्वी ते पत्रकारांशी बोलत होते.

१९९३च्या दंगलीत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी बोटचेपी भूमिका घेतली असती, तर मुंबईत हिंदू जीवंत राहिला नसता, असेही त्यांनी या वेळी मत व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की, त्रिपुरामध्ये घटना काय घडली, हे नीट कुणालाही माहिती नाही. त्यासंदर्भात एक व्हिडिओ बनवून व्हायरल केला जातो. त्यानंतर अमरावती, नांदेड, मालेगावमध्ये अशांतता पसरवली जाते. १५ ते २० हजार संख्येने रस्त्यावर उतरून माजी मंत्री जगदीश गुप्तांसह अनेकांची कार्यालयाची तोडफोड करायची. याचा काय संबंध आहे? त्यामुळे शनिवारच्या घटनेत भाजपचा हात असेल, तर त्यापूर्वीच्या तोडफोडीच्या घटनेत संजय राऊतांचा हात आहे का?

भाजप नेत्यांच्या धरपकडीवर बोलताना माननीय पाटील म्हणाले की, अमरावती, नांदेड, मालेगावमध्ये शुक्रवारी जे घडले, त्यामध्ये ज्यांचा ज्यांचा हात आहे, त्यांना आधी अटक करा. नांदेडमध्ये भाजप जिल्हाध्यक्षांनी बंदची हाक दिली आहे. त्या बंदवर आक्षेप घेणाऱ्यांनी शुक्रवारच्या घटनेतील १०० जणांना अटक केली आहे का? हे आधी स्पष्ट करावे, १५ ते ३० हजारचा जमाव रस्त्यावर उतरून अशांतता पसरवतो. तेव्हा पोलिसांचे गुप्तहेर खाते करते, तरी काय? असा सवालही त्यांनी या वेळी उपस्थित केला.

# झोपडपट्टीवासीयांना न्याय मिळवून देण्यासाठी भाजप प्रयत्नशील

## नगरसेवक प्रकाश बिनेदार यांचे प्रतिपादन

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

झोपडपट्टीवासीयांना न्याय मिळवून देण्यासाठी भाजप प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन पनवेल महापालिकेचे नगरसेक प्रकाश बिनेदार यांनी केले. ते झोपडपट्टीवासीयांच्या नवनाथ नगर येथील शनिवारी (दि. १३) झालेल्या जाहीर सभेत संबोधित करीत होते. या वेळी नगरसेविका सुशीला घरत उपस्थित होत्या.

नवीन पनवेल भीमनगर झोपडपट्टी पाडण्यासाठी मोठ्या पोलीस बंदोबस्तात आलेल्या सिडकोच्या अतिक्रमणविरोधी पथकाला आमदार प्रशांत ठाकूर यांच्या ठिय्या आंदोलनामुळे कारवाई न करता माघारी जावे लागले होते. या पार्श्वभूमीवर नवनाथ नगर येथे झोपडपट्टीवासीयांची जाहीर सभा झाली. या सभेत पनवेल महापालिकेचे नगरसेवक प्रकाश बिनेदार यांनी झोपडपट्टीधारकांचे मत जाणून घेतले.

ते झोपडपट्टीवासियांना संबोधित करताना म्हणाले की, जोपर्यंत पुनर्वसन होत नाही तोपर्यंत एकाही झोपडीला हात लावून देणार नाही. आमदार प्रशांत ठाकूर हे झोपडपट्टीवासीयांच्या पाठिशी खंबीरपणे उभे आहेत. सभागृह नेते परेश ठाकूर हे पनवेल महापालिकेच्या माध्यमातून सातत्याने झोपडपट्टीवासीयांना स्वत:चे हक्काचे घर लवकरात लवकर मिळावे यासाठी प्रयत्न करीत आहेत. झोपडपट्टीधारकांसाठी डीपीआर १,२ मंजूर झाला असून अडीच हजार घरांच्या निर्मितीसाठी टेंडर निघाला आहे. लवकरच या ठिकाणी प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल. डीपीआर ३,४ हेदेखील केंद्र व राज्य शासनाकडून मंजुर करून घेऊन त्यांचेही टेंडर लवकरच काढले जाईल व दोन हजार घरे मिळवून देण्याची योजना राबवली जाईल, असे बिनेदार यांनी सांगितले.

सिडकोच्या जागेवर असलेल्या झोपड्यांचा कोणताही सर्व्हे सिडकोने केलेला नाही. तसेच झोपडपट्टीवासीयांबाबत सिडकोने कोणतीही सकारात्मक भूमिका घेतलेली नसल्याची नाराजी या वेळी झोपडपट्टीवासीयांनी व्यक्त केली. यानंतर त्यांनी झोपडपट्टीवासीयांचा प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर व सभागृह नेते परेश ठाकूर तसेच सर्व नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे या सभेतून आभार व्यक्त केले.

या सभेला भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे प्रसिद्धीप्रमुख रावसाहेब खरात, उत्तर रायगड जिल्हा संयोजक राहुल वाहुळकर, सामाजिक कार्यकर्ते अशोक आंबेकर, भाजप झोपडपट्टी सेलचे पनवेल शहर अध्यक्ष चंद्रकांत मंजुळे, ज्येष्ठ कार्यकर्ते संजय जाधव, शांताराम कोळी, संतोष किर्तीकर, पसु शिंदे, भानुदास वाघमारे, तसेच जरीना शेख, नंदा टापरे, कविता गुप्ता, सुनिता सकपाळ, सुनिता पवार, आस्मा शेख, रेश्मा कांबळे, अमोल लहाने, सतिश बोरूडे, विजय झिरे, तानाजी शिंदे, किरण वाहुळकर, आनंद वाहुळकर, दिलीप जाधव, दीपक वाहुळकर, हिरामण साळुंखे, आनंद जाधव आदी उपस्थित होते.



# एसटी कर्मचाऱ्यांच्या मागणीला भारतीय मजदूर संघांचा पाठिंबा

**उरण : वार्ताहर**

एसटी महामंडळाचे राज्य सरकारमध्ये विलिनीकरण करा, या मागणीला भारतीय मजदूर संघ रायगड जिल्हा या संघटनेने पाठिंबा दिला असून संघटनेतर्फे त्याबाबतचे पत्र मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पाठविले आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांनी २७ ऑक्टोबरपासून आपल्या विविध मागण्यांबाबत आंदोलन सुरु केलेले आहे. या आंदोलनात वेतन आयोग, महागाई भत्ता याबरोबरच मुख्य मागणी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे विलिनीकरण करा ही आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ हा राज्य सरकारचा अत्यंत महत्वाचा उपक्रम आहे. गेल्या काही वर्षांपासून हा उपक्रम दिवसेंदिवस अधिकाधिक तोट्यात जात आहे. कोरोनाच्या काळात या परिवहन सेवेने खूप चांगली सेवा दिली, मात्र अत्यल्प वेतनामुळे कर्जबाजारी होऊन अनेक कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केली. अनेक वर्ष महामंडळाची सेवा करुन निवृत्त झालेल्या कामगारांना त्यांची कायदेशीर देणी अद्यापपर्यंत मिळालेली नाहीत. या सर्व प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधावे आणि हे प्रश्न सोडवून घेण्यासाठी कामगारांनी काम बंद आंदोलन सुरू केले आहे. कामगारांची एकच मागणी आहे की, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ हे राज्य सरकारमध्ये विलीन करण्यात यावे आणि या कर्मचाऱ्यांना राज्य कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन व भत्ते मिळावे. या महामंडळातील कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा अशी आग्रहाची विनंती आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

एसटी संपकऱ्यांची भेट घेऊन संघटनेतर्फे हे निवेदन मुख्यमंत्र्याकडे पाठविण्यात आले. या वेळी संघटनेचे अध्यक्ष सुरेश पाटील, उरण तालुकाध्यक्ष लंकेश म्हात्रे, कामगार नेते सुधीर घरत, रंजनकुमार आदी उपस्थित होते.



# भाजप बेस्ट कामगार संघातर्फे एसटी कर्मचाऱ्यांसाठी जेवणाची व्यवस्था



**मुंबई : प्रतिनिधी**

भाजप बेस्ट कामगार संघातर्फे आझाद मैदानावर आंदोलनामध्ये सहभागी झालेल्या एसटी कामगारांना शनिवारी (दि. १४) भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. त्यावेळी उपस्थित विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांच्यासह आमदार गोपीचंद पडळकर व आमदार सदाभाऊ खोत यांनी कामगारांच्या प्रश्नांवर चर्चा करून कामगारा सोबत सहभोजन केले.

भाजप बेस्ट कामगार संघाचे अध्यक्ष गणेश हाके व सरचिटणीस गजानन नागे, उपाध्यक्ष बबनराव बारगजे, आनंद जरग श्रीकांत गलांडे, पश्चिम महाराष्ट्र आघाडीचे पदाधिकारी सहभागी होऊन एसटी कामगारांना सक्रिय पाठिंबा जाहीर दिला. ग्रामीण भागातून आलेल्या सर्व एसटी कामगारांना आजाद मैदानावर्ती जेवणाची व्यवस्था करण्याची अत्यंत गरज आहे. यासाठी अनेक स्वयंसेवी संस्था पुढाकार घेऊन त्यांना जेवण पुरविणे आवश्यक आहे. याचाच एक भाग म्हणून भाजप बेस्ट कामगार संघाच्या काही प्रतिनिधींनी लोकवर्गणी गोळा करून सर्व राज्य परिवहन महामंडळाच्या कामगारांना जेवणाची व्यवस्था केली.

या वेळी भाजप बेस्ट कामगार संघाचे उपाध्यक्ष बबनराव बारगजे यांनी एसटी महामंडळाच्या सर्व कर्मचाऱ्यांना आमचा पाठिंबा आहे व यापुढे तुम्हाला जी काही मदत लागेल ती आम्ही करू, असे आश्वासन दिले. सर्व कामगारांनी पाठिंब्याने नैतिक बळ मिळाले आहे असे म्हणत आभार व्यक्त केले.

# 'बाळासाहेबांच्या आत्म्याला किती यातना होत असतील'

**पुणे : प्रतिनिधी**

ज्या कारणाने शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेना स्थापन केली, त्या बाळासाहेबांच्या आत्म्याला किती यातना होत असतील याचा प्रत्यय मला आहे. सध्याचे जे गणित आहे ते चुकलेले आहे. हे सुधारायचे असेल तर शिवसेना आणि भाजप एकत्र आल्याशिवाय पर्याय नाहीच, असे रोखठोक मत ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले यांनी व्यक्त केले.



अभिनेते विक्रम गोखले मीडियाशी संवाद साधताना म्हणाले की, शिवसेना-भाजप एकत्र यावेत म्हणून माझे प्रयत्न सुरू आहेत. तुमचे तरी काय बिघडले असते. ती चूक झाली. ज्यांना फॉलोअर्स असतील त्यांनी शिवसेना आणि भाजपच्या आघाडीसाठी पुढाकार घायला हवा, मी घेतोय पुढाकार, असे विक्रम गोखले म्हणाले.

या वेळी त्यांनी एसटीच्या संपावरही प्रतिक्रिया व्यक्त केली. एसटी महामंडळाचा मी ब्रँड ॲम्बेसिडर होतो. एअर इंडिया आणि एसटीला राजकारण्यांनी गाळात घातले आहे, अशी टीका त्यांनी केली.

गोखलेंनी आर्यन प्रकरणावरही भाष्य केले. मी अत्यंत स्पष्ट सांगतो. शाहरुख खान आणि आर्यन माझे काहीही वाकडे करू शकणार नाही. देशाच्या बॉर्डरवर २१ वर्षांचा जवान गोळी लागून मरतो तेव्हा तो खरा हिरो असतो. आर्यन हिरो नाही, असे त्यांनी सांगितले. यासोबत स्वातंत्र्याच्या बाबतीत अभिनेत्री कंगना रनौत हिने केलेल्या वक्तव्याबद्दल कंगना जे म्हणाली ते खरे आहे असे म्हणत गोखले यांनी समर्थन केले.

# जेएनपीटी शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात?

**उरण : प्रतिनिधी**

जेएनपीटीने खर्च कमी होण्याच्या हेतूने आधीच्या जुन्या शिक्षण संस्थेकडून दोन वर्षांपूर्वी नव्याने १५ वर्षांच्या करारावर आर. के. फाउंडेशनला जेएनपीटी प्रशासनाने शाळा चालविण्यासाठी दिली आहे, मात्र या आर. के. फाउंडेशन व्यवस्थापनेच्या अनागोंदी कारभारामुळे जेएनपीटी शाळेतील तब्बल दोन हजार ७०० विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य धोक्यात येण्याची वेळ येऊन ठेपली आहे. विद्यार्थ्यांचे अतोनात शैक्षणिक नुकसान होत असल्याने या संस्थेच्या कारभाराबाबत संताप व्यक्त करण्यात येत आहे.

जेएनपीटीची कामगार वसाहतीमध्ये केजी ते दहावीपर्यंत इंग्रजी व मराठी माध्यमाची शाळा आहे. या शाळेत सुमारे दोन हजार ७०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या आधी मागील २० वर्षांपासून सलग २० वर्षे जेएनपीटीने इंडियन एज्युकेशन सोसायटी मुंबई या संस्थेला ही शाळा करारावर चालविण्यास दिली होती. शाळेच्या शैक्षणिक बाबींसाठी जेएनपीटी वर्षाकाठी सुमारे चार कोटी रुपये खर्च करीत होती. वाढता शैक्षणिक खर्च कमी करण्याच्या हट्टापायी संस्थेची असलेला करार संपुष्टात आल्यानंतर निविदा काढण्यात आल्या होत्या.

दोन वर्षांपूर्वी काढण्यात आलेल्या निविदानंतर एक कोटी ९० लाख एवढ्या वार्षिक खर्चावर तयार झालेल्या मालाड-मुंबई येथील रुस्तमजी केरावाला फाउंडेशनला ही शाळा १ जुलै २०१९ पासून चालविण्यासाठी देण्यात आली आहे. या शाळेच्या अनागोंदी कारभाराचा पहिला फटका बसला तो या शाळेत मागील ३० वर्षांपासून काम करीत असलेल्या ११४ शिक्षकांना शाळेच्या वेतन कपात, निलंबन नाट्याविरोधात शिक्षकांचा मागील दोन वर्षांपासून आर. के. फाउंडेशनच्या विरोधात संघर्ष सुरू आहे.

आर. के. फाउंडेशनेच्या मनमानी आणि नियमबाह्य कारभाराचे चटके शिक्षकांबरोबरच आत्ता दोन हजार ७०० पालक, विद्यार्थ्यांनाही बसू लागले आहेत. त्यामुळे शेकडो विद्यार्थ्यांना नाईलाजाने दुसऱ्या शाळेत प्रवेश घ्यावा लागणार आहे. तसेच मान्यतेअभावी या शाळेत शिक्षण घेत असलेल्या शेकडो दहावीच्या विद्यार्थ्यांना मागील दोन वर्षांपासून जुन्या संस्थेच्या शाळेकडून परीक्षेचे फार्म भरून परीक्षा देण्याची वेळ आली असल्याचे सांगण्यात येत आहे. शाळेत २५ टक्के गरीब-गरजू विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देण्यात येतो, मात्र अशा विद्यार्थ्यांनाही प्रवेशासाठी दुसऱ्या शाळेची वाट धरावी लागणार आहे. फक्त खर्च वाचविण्यासाठी जेएनपीटीने दुसऱ्या संस्थेला शाळा चालवायला दिली खरी, मात्र जेएनपीटी व्यवस्थापनाच्या मनमानी कारभारामुळे दोन हजार ७०० विद्यार्थ्यांचे अतोनात शैक्षणिक नुकसान होत आहे.

या प्रकरणी जेएनपीटी वर्कर्स युनियनने जेएनपीटीचे चेअरमन संजय सेठी यांच्याकडे ६ सप्टेंबर २०२१ रोजी तक्रारी अर्ज करून या संस्थेच्या मनमानी, अनागोंदी करभराला पायबंद घालून विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळण्याची मागणी केली असल्याची माहिती संघटनेचे सरचिटणीस तथा जेएनपीटीचे माजी कामगार विश्वस्त रवींद्र पाटील यांनी दिली.

न्यायालयात खटला दाखल असल्याने संस्थेकडून माहिती देण्यात नकार जेएनपीटी अंतर्गत असलेल्या व सध्या रुस्तुमजी केरावा फाउंडेशनच्या अखत्यारीत असलेल्या या जेएनपीटी शाळा व्यवस्थापनाविरोधात विविध बाबींवर मुंबई उच्च न्यायालयात खटला दाखल असून, हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे सांगत या प्रकरणी आर. के. फाउंडेशन प्रशासनाने अधिक माहिती देण्यास नकार दिला आहे.

> **जेएनपीटीच्या शाळेचे कामकाज नियमानुसार व योगतेने सुरू आहे. जेएनपीटीचे काही कामगार आणि शिक्षक पालकवर्ग चुकीचे आरोप करीत जेएनपीटी प्रशासन आणि जेएनपीटी शाळेची नाहक बदनामी करीत आहेत. मागील दोन वर्षांत कोविड काळादरम्यान शाळा बंद असल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. ते प्रश्न सोडविण्यासाठी जेएनपीटी प्रयत्नशील आहे.**
>
> **-जयंत ढवळे, मुख्य प्रबंधक, जेएनपीटी प्रशासन**

पान १ वरून

## एसटी कामगारांच्या आत्महत्यांना रक्तपिपासू आघाडी सरकारच जबाबदार

आझाद मैदानासमोर मुंबई महापालिका आहे, जिथे ८० हजार कोटींचे फिक्स डिपॉझिट आहेत, पण इथे मराठी माणूस आंदोलन करतोय त्यांना लाईट आणि पाण्याचीही सुविधा दिली जात नाही. या सत्ताधाऱ्यांना लाज कशी वाटत नाही? उद्या यासाठी महापालिका आयुक्तांची भेट घेणार असल्याचे ते म्हणाले.

मायावी राक्षसासारखे हे सरकार शब्दांत सामान्यांना भुलवत आहे. यांचे खायचे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत. काळीज नसलेले हे सरकार आहे. मंत्री म्हणतात, एसटी रक्तवाहिनी आहे. मग तुम्ही आता रक्तपिपासू का बनलात? असा सवाल करून ४० जणांचे बळी तुम्ही घेतलेत, अशी टीका त्यांनी केली.

## जीवनात शिक्षण महत्त्वाचे

मंत्रीमहोदय आपल्या समाजातील एक युवक स्वतःचे क्षेत्र सोडून शिक्षणाच्या क्षेत्रात पाऊल ठेवत आहे. त्याचे कौतुक केले पाहिजे या भावनेने येथे आल्याबद्दल त्यांना आमदार प्रशांत ठाकूर यांनी धन्यवाद दिले. अशा प्रकारच्या कार्यक्रमाने हा देश समृद्ध होत जाईल, असेही ते म्हणाले. तसेच रमेश तुपे यांनी शैक्षणिक क्षेत्रात जे पाऊल उचलले आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, सावित्री बिल्डर्स अॅण्ड डेव्हलपर्सच्या वतीने पुष्पकनगर येथे सावित्री इनक्लेव्ह ही नूतन इमारत बांधण्यात येत आहे. या इमारतीच्या कामाचे भूमिपूजन केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री ए. नारायणस्वामी यांच्या हस्ते करण्यात आले.

# भाजप प्रदेश कार्यकारिणीची उद्या बैठक

**मुंबई : प्रतिनिधी**

भाजप महाराष्ट्राच्या सर्व प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत पक्षाची प्रदेश कार्यकारिणी बैठक मंगळवारी (दि. १६) नोव्हेंबर रोजी मुंबईत होणार असून भ्रष्टाचार, गुन्हेगारीकरण आणि महाविकास आघाडी सरकारकडून झालेली जनतेची फसवणूक या महत्त्वाच्या विषयांबाबत बैठकीत पक्षाची भूमिका स्पष्ट होणार आहे, अशी माहिती भाजप प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी दिली.

उपाध्ये म्हणाले की, प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या एक दिवसाच्या कार्यकारिणी बैठकीचे उद्घाटन पक्षाचे राष्ट्रीय प्रभारी व राष्ट्रीय सरचिटणीस सी. टी. रवी करणार आहेत. बैठकीत तीन ठराव मांडण्यात येतील. पक्षाच्या आगामी वाटचालीची दिशा मान्यवरांच्या मार्गदर्शनातून आणि ठरावांद्वारे स्पष्ट होईल.


बैठकीस प्रदेश पदाधिकारी, खासदार, आमदार, जिल्हाध्यक्ष उपस्थित राहतील. तसेच विविध जिल्हास्थानी पक्षाचे पदाधिकारी ऑनलाइन पद्धतीने कार्यकारिणी बैठकीत सहभागी होतील, असेही उपाध्ये यांनी सांगितले.




**पनवेल : बालदिनी बच्चेकंपनी आनंदोत्सव साजरा करीत असताना गोरगरीब मुलांना मात्र स्वत:सह कुटुंबीयांच्या पोटाची खळगी भरण्यासाठी नित्यनेम काबाडकष्ट करावे लागतात. असाच एक लहान मुलगा आपला तोल सांभाळून दोरीवरची कसरत करताना कॅमेऱ्यात टिपला गेला आहे.**


## दुखवटा

### मीना वाजपेयी



**मुंबई :** ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, नेहरुनगर तालुका महिला काँग्रेसच्या माजी अध्यक्ष मीना चंद्रकांत वाजपेयी (वय ७६) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात कन्या, मुलगा, जावई, सून, दोन नात असा परिवार आहे. कै. मीना वाजपेयी यांनी नेहरुनगर, कमानी, कुर्ला, विद्याविहार, घाटकोपर परिसरात आपल्या सामाजिक कार्याचा ठसा उमटविला आहे.

### बामजी कडू



**अलिबाग :** तालुक्यातील पेझारी येथील प्रसिद्ध गणेश मूर्तीकार बामजी जोमा कडू (वय ८२) यांचे मंगळवारी (दि. ९) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कै. बामजी कडू यांनी अनेक प्रकारच्या गणेशमूर्ती साकारल्या. ते उत्कृष्ठ चित्रकार होते. शाडूच्या मातीचे अथवा पीओपीमधील मॉडेल्स हुबेहुब रेखीवपणे साकारण्यात त्यांचा हातखंडा होता. बामजी कडू यांचा दशक्रिया विधी गुरुवारी (दि. १८) पेझारी-आंबेपूर येथे होणार असून उत्तरकार्य शनिवारी (दि. २०) होणार आहे.

# नवी मुंबईत क्षयरुग्ण शोधमोहीम

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार १५ ते २५ नोव्हेंबर २०२१ या कालावधीत सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहीम नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात अतिजोखमीच्या भागात राबविण्यात येत आहे. कमीत कमी कालावधीत समाजातील निदान न झालेले क्षयरुग्ण शोधून त्यांना उपचार कक्षेत आणणे व क्षयरोगाबाबत समाजात जनजागृती करणे हा या मोहिमेचा उद्देश आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत ही मोहीम शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अतिजोखमीच्या कार्यक्षेत्रात राबविण्यात येत असून महापालिका आयुक्त अभिजित बांगर याच्या



मार्गदर्शनाखाली गठीत केलेल्या ९५ पथकांच्या माध्यमातून १,८९,८९१ नागरिकांना भेटी देऊन तपासणी करण्यात येणार आहे तसेच जनजागृती करण्यात येणार आहे. प्रत्येक पथक दररोज ४० ते ५० घरांना भेटी देऊन माहिती संकलीत करेल.

दोन आठवड्यांपेक्षा जास्त कालावधीकरीता खोकला, दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळासाठी ताप, वजनात लक्षणीय घट, थुंकीवाटे रक्त येणे, छातीत दुखणे, मानेवरील गाठ अशा लक्षणांबाबत विचारणा करण्यात येणार आहे. यामध्ये क्षयरोगाची लक्षणे आढळल्यास संबंधितांचे थुंकी नमुने आणि एक्स रेद्वारे तपासणी करुन अंतिम निदान निश्चित करण्यात येणार आहे.

या मोहिमेमुळे क्षयरोगाच्या निदानाअभावी अद्यापही वंचित असणाऱ्या क्षयरुग्णांचा प्रशिक्षित पथकाद्वारे शोध घेण्यात येणार असून त्यांना क्षयरोग औषधोपचाराच्या कक्षेत आणणे हे उद्दिष्ट साध्य करण्यात येणार आहे. या मोहिमेमध्ये नागरिकांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन क्षयरोगाची लक्षणे आढळल्यास थुंकी नमुने देऊन उद्दीष्ट साध्य करण्यास सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# नवी मुंबई पालिकेतील ३३ जणांची थेट बदली

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कार्यालयीन कामकाजात शिस्त रहावी व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने काही दिवसांपूर्वी आरोग्य विभागात मोठ्या प्रमाणावर केलेल्या बदल्यांनंतर शनिवारी नवी मुंबई महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी स्थानिक संस्था कर (एलबीटी) विभागात पाच वर्षांहून अधिक काळ कार्यरत असणाऱ्या ३३ अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. यामुळे महापालिकेतील वातावरण ढवळून निघाले आहे.

बदल्यांमध्ये कायमस्वरूपी महापालिका आस्थापनेवर असलेले १७ अधिकारी आणि कर्मचारी तसेच १६ करार पद्धतीवरील कर्मचारी अशा एलबीटी विभागातील एकूण ३३ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या बदल्यांद्वारे पारदर्शक कामकाजाला महत्त्व दिले जात असून दैनंदिन कामकाजात गतिमानताही येणार आहे, असा विश्वास आयुक्त बांगर यांनी व्यक्त केला.

महापालिकेतील लाचखोरीची प्रकरणे उघडकीस आल्यावर महापालिकेवर विविध स्तरांतून टीका केली जात आहे. अनेक अधिकारी-कर्मचारी मलाईदार खात्यातच चिकटून बसले आहेत. त्यामुळे त्यांचा कारभार भ्रष्ट होत चालला आहे, हे रोखण्यासाठी नियमानुसार दर अडीच वर्षांनी बदली होणे अपेक्षित आहे, मात्र अनेक वर्षांपासून हे अधिकारी-कर्मचारी एकाच खात्यात जागा अडवून बसले आहेत. त्यांच्या बदल्या होत नसल्याने गैरकारभार होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे वेळेवर त्यांच्या बदल्या होणे गरजेचे असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

# खारघरमध्ये भाजपचे परिसर स्वच्छता अभियान

**खारघर : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या वतीने खारघरच्या सेक्टर २० व २१मध्ये रविवारी (दि. १४) सकाळी ७ वाजता नाल्यातील तसेच रस्त्याच्या आजूबाजूला सुकलेल्या झाडांच्या फांद्या, कुडा कचरा, डेब्रिज उचलून व सफाईकरून परिसर स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

नगरसेवक प्रवीण काळूराम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिका सफाई कर्मचारी यांनी परिसर स्वच्छ, सुंदर करण्यासाठी सेवा कार्याला उत्तम प्रतिसाद दिला. या वेळी खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक रामजी बेरा व रहिवाशी उपस्थित होते.





# पॅन इंडिया अवेरनेस कार्यक्रमाचा समारोप

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तहसीलदार कार्यालय येथे पॅन इंडिया अवेरनेस कार्यक्रमाचा समारोप सोहळा आयोजित करण्यात आला होता. यामध्ये जिल्हा न्यायाधिश आणि अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष माधुरी आनंद यांनी उपस्थितांना संबोधित केले.




त्या म्हणाल्या की, पॅन इंडिया अवेरनेस प्रोग्रॅम हा गेली ४५ दिवस पनवेल परिसरात राबविण्यात येत असून याच्या माध्यमातून कायद्याची ज्ञानगंगा वेगवेगळ्या ठिकाणी व प्रामुख्याने खेडोपाडी आदिवासी बांधवांकडे पोहोचविण्याचे काम संपन्न झाले. त्याचा समारोप करताना एक वेगळी उर्जा घेऊन जात आहे.

शासनाचे जे विविध उपक्रम आहेत त्यांना अनुसरून २ ऑक्टोबर गांधी जयंती ते १४ नोव्हेंबर पंडित जवाहरलाल नेहरू जयंती निमित्ताने गेले ४५ दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात बेटी बचाव, बेटी पढाव, आदिवासींना कोर्टाची माहिती देणे, कामकाजाबद्दल माहिती देणे, मोफत सल्ला मोफत कायदे तज्ञांमार्फत देणे, वृक्षारोपण आदी विविध उपक्रम राबवून कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. याला लॉ स्टूडंट व सामाजिक कार्य करणाऱ्या वकिलांनीसुद्धा पाठिंबा दिला व त्यांनी कायद्याची ज्ञानगंगा पोहोचविण्याचे काम केले असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास जिल्हा न्यायाधिश पनवेल जे.जे. मोहिते, तहसिलदार विजय तळेकर, पनवेल बार असोशिएशनचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, पनवेल महानगरपालिकेच्या उपायुक्त तृप्ती सांडभोर, सहदिवाणी न्यायाधिश आर. एस. भाकरे, सामाजिक कार्यकर्ते रवीशेठ पाटील, ॲड. चंद्रकांत मढवी आदी उपस्थित होते.

पनवेल बार असोशिएशनचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ यांनी सांगितले की, पक्षकार व वकिल यांचे संबंध चांगले असले पाहिजे. कायद्याची माहिती व त्याचा सदुपयोग करणे गरजेचे आहे. पहिल्यांदा कोर्टीत न जाता प्रथम तडजोड करून मार्ग काढावा. याने तुमचा वेळ, पैसा व मनस्ताप वाचत असल्याचे त्यांनी सांगितले. यानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे अनुभव उपस्थितांनी सांगितले.

या निमित्ताने जिल्हा न्यायालय पनवेल येथून प्रभात फेरी काढण्यात आली. तिची सांगता पनवेल तहसिल कार्यालय येथे करण्यात आली. तसेच अभियान यशस्वी केल्याबद्दल उपस्थित मान्यवरांना प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

# 'होपमिरर'तर्फे गरजूंना ब्लँकेट्स वाटप

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

हिवाळा ऋतू जवळ येत आहे. त्यात गरजु व वंचित मुलांना थंडीचा सामना करण्यासाठी नवी-मुंबईमधील होपमिरर चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने ब्लँकेट्स वाटप उपक्रम हाती घेतला आहे. यामध्ये पनवेल, नवी मुंबई नजीकच्या रस्त्याच्या कडेला व फुटपाथवरील १०० गरजवंताना ब्लँकेट्सचे वाटप करून मायेची ऊब दिली आहे. स्वेटर वितरणानंतर त्याच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले.



अनेक वंचित नागरिक कोणत्याही उष्णतेशिवाय फूटपाथ आणि रस्त्याच्या कडेला आसरा शोधत असतात व त्या ठिकाणी झोपतात. म्हणून त्यांची दखल घेऊन होपमिरर चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने ब्लँकेट्स वाटप करण्यात आले. तर दिवाळीपूर्वी होपमिरर चॅरिटेबल ट्रस्टच्या टीमने नवी मुंबईतील विविध भागात १५० गरजू व गरीब मुलांना स्वेटरचे वाटप केले आहे.

आपण घरी असताना थंडीचा सामना करू शकतो, परंतू जे फुटपाथ वर राहतात त्यांना खऱ्या अर्थाने मायेची ऊब दिली पाहिजे, असे होपमिरर चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष रमजान शेख यांनी बोलताना सांगितले.

# नवी मुंबईत वस्ताद लहुजी साळवे यांचा जयंती उत्सव

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

वस्ताद लहुजी साळवे यांची २२७वी जयंती वाशी येथील असंघटित नाका कामगारांनी साजरी केली. प्रारंभी, वस्ताद लहुजी साळवे यांच्या प्रतिमेस कामगार नेते प्रदीप बी. वाघमारे यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आली.

या वेळी कामगारांना मार्गदर्शन करताना वस्ताद लहुजी साळवे यांनी केलेल्या कार्याची महती सांगण्यात आली. विजय गायकवाड, वाशी नाका कामगार कमिटीचे राजू घोडे, राजेश पारवे, कृष्णा घटोळे, अशोक चव्हाण, लक्षण थोरात, रामकीसन तांबे, जनार्धन थांबे, राजू घटोळे, नामदेव भिसे, गोपीनाथ तांबे, अनिल तांबे, शिवाजी कांबळे, राजू गायकवाड, राजू उबाळे, शिवाजी वंजारे, योगेश रोकडे, धीरज पाटोळे आदी उपस्थित होते.



# 'रोटरी'तर्फे डायबिटीज डे साजरा

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक डायबिटीज डेच्या निमित्ताने रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाउनच्या वतीने शनिवारी (दि. १३) सायंकाळी ५.३० वाजता येथील फ्लाइट लेफ्टनंट तुषार चव्हाण गार्डनमध्ये डायबिटीज डे साजरा करण्यात आला.




या कार्यक्रमाला पनवेलच्या प्रसिद्ध डायबिटीज स्पेशालिस्ट डॉ. किर्ती समुद्रा यांचे ज्येष्ठ नागरिकांसाठी बहुमूल्य व सखोल असे मार्गदर्शन व उपस्थित नागरिकांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. या वेळी कार्यक्रमाला प्रचंड प्रमाणात ज्येष्ठ नागरिकांची उपस्थिती होती.

या वेळी मे. बायोकॉन बायोलॉजीक्सच्या वतीने सर्व उपस्थीतांना डायबिटीज अवेअरनेससाठी टी शर्ट व कॅपचे वाटप करण्यात आले. तसेच या वेळी मॅनकाईड फार्माच्या वतीने उपस्थित नागरिकांची ब्लड शुगर टेस्ट विनामुल्य करण्यात आली. बायोकॉन बायोलॉजीक्सच्या वतीने अक्षय गोळे व मॅनकाईड फार्माच्या वतीने निखील तेंडुलकर उपस्थित होते.

या कार्यक्रमाला रोटरी क्लब ऑफ कामोठेचे माजी अध्यक्ष शशिकांत म्हात्रे, रोटरी क्लब ऑफ पनवेलचे सेक्रेटरी विनोद गुरमे, व्ही. सी. म्हात्रे, बालाजी घुमे, प्रकाश पाटील, किसन पवार, संजय जैन व प्रिती गुरमे उपस्थित होते. व्ही. सी. म्हात्रे यांनी पाहुण्यांचे आणि उपस्थितांचे स्वागत केले, तर उपस्थितांचे आभार विनोद गुरुमे यांनी मानले.

# दक्षिण आफ्रिकेतील आंबा नवी मुंबई एपीएमसीत दाखल

## दर १२०० रुपये किलो, चव हापूससारखीच

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

दक्षिण पूर्व आफ्रिकेतील मलावी देशातील आंबा मागील काही वर्षांपासून भारतात विक्रीसाठी येऊ लागला आहे. हापूससारखी चव, रंग व आकार असलेल्या या आंब्याची मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गुरुवारी आवक झाली. पहिल्या दिवशी २३० बॉक्स विक्रीसाठी आले आहेत.

घाऊक बाजारामध्ये १२०० ते १५०० रुपये किलो दराने हा आंबा विकला जात असून, १५ डिसेंबरपर्यंत याचा हंगाम सुरू राहणार आहे. हा आंबा दिवाळीच्या दरम्यान, मार्केटमध्ये येत असल्यामुळे ग्राहकांचीही त्याला पसंती मिळते. यावर्षी गुरुवारी २३० बॉक्स मुंबई बाजार समितीमध्ये आले आहेत. तीन किलो वजनाचा एक बॉक्स असून, त्यामध्ये ९ ते १२ आंबे बसतात.

यावर्षी हवाई वाहतुकीवरील खर्च वाढल्यामुळे मलावी आंबा ग्राहकांना जादा दराने विकत घ्यावा लागणार आहे. पहिल्या दिवशी होलसेल मार्केटमध्ये १२०० ते १५०० रुपये प्रतिकिलो दर मिळाला आहे. मुंबईमध्ये १५ डिसेंबरपर्यंत या आंब्याचा हंगाम सुरू राहणार असून पुढील एक महिन्यात मोठ्या प्रमाणात आवक होण्याची शक्यता आहे.

मलावी देशात कोकणाप्रमाणे वातावरण आहे. तेथील शेतकऱ्यांनी २०११ मध्ये हापूस आंब्याची रोपे नेली होती. तेथे ४०० एकरमध्ये आंबा लागवड करण्यात आली आहे. एक एकरमध्ये ४०० रोपे लावण्यात आली आहेत. नोव्हेंबरमध्ये तेथील आंबा तयार होत असून तो भारतासह इतर देशात विक्रीसाठी पाठविला जातो. कोकणच्या हापूसची चव असल्यामुळे ग्राहकांकडून पसंती मिळत आहे.

# भाजपकडून पाले येथील शाळेला इन्व्हर्टर

**उरण : वार्ताहर**

भारतीय जनता पक्ष उरण पूर्व विभागातर्फे रायगड जिल्हा परिषदेच्या पाले येथील शाळेला इन्व्हर्टर प्रदान करण्यात आले.

उरण तालुका महिला अध्यक्ष राणी सुरज म्हात्रे, पंचायत गण अध्यक्ष प्रशांत ठाकूर, जिल्हा परिषद युवा चिटणीस पंकेश म्हात्रे यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हा परिषद, पाले शाळेला इन्व्हर्टर देण्यात आले.

या वेळी भाजप उरण तालुका महिला अध्यक्ष राणी सुरज म्हात्रे, पंचायत समिती अध्यक्ष प्रशांत ठाकूर, जिल्हा परिषद युवा चिटणीस पंकेश म्हात्रे, पाले गाव अध्यक्ष अमित म्हात्रे, रमाकांत म्हात्रे, युवा अध्यक्ष प्रदीप म्हात्रे, युवा उपाध्यक्ष प्रकाश म्हात्रे, हनुमान म्हात्रे, सुयोग म्हात्रे, अक्षय म्हात्रे, मीना म्हात्रे, मेघा म्हात्रे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



# पं. नेहरू जयंती, बालदिन जासई हायस्कूलमध्ये उत्साहात



**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेजमध्ये भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांची जयंती व बालदिन साजरा करण्यात आला.

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेस शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष तसेच भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय सरचिटणीस सुरेश पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी विद्यालयाचे प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग, उपमुख्याध्यापक मोरे, रयत सेवक संघाचे समन्वयक नुरा शेख, डी. बी. म्हात्रे, शिपाई मुंबईकर आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# अशांत महाराष्ट्र

पुरोगामी म्हणून ओळखला जाणारा महाराष्ट्र सध्या अनेक कारणांनी धुमसतोय. आधीच राज्यात शेतकऱ्यांचे प्रश्न, एसटी कर्मचाऱ्यांचा संप यावर मार्ग काढण्यात आघाडी सरकारला अपयश आल्याने अस्वस्थता पसरलेली असताना आता हिंसाचाराचा वणवा पेटलाय. निमित्त झाले ते त्रिपुरातील कथित घटनेचे. यावरून महाराष्ट्रातील अनेक शहरांत मोर्चे निघाले आणि जे व्हायला नको होते तेच झाले.

**देशाच्या ईशान्य भागात असलेल्या त्रिपुरामध्ये गेल्या काही दिवसांमध्ये धार्मिक तणाव पसरलेला आहे. खरे तर याचे मूळ बांगलादेशात आहे. नवरात्रोत्सवादरम्यान बांगलादेशात दुर्गापूजेचे मंडप काही धर्मांध मंडळींनी उद्ध्वस्त केले होते. त्याचे पडसाद त्रिपुरात उमटले. त्रिपुरा हे राज्य बांगलादेशला लागून असल्यामुळे या ठिकाणी संतप्त प्रतिक्रिया उमटल्या. समाजात तेढ निर्माण होईल असे कृत्य कुणीही करणे समर्थनीय नाही, परंतु क्रियेवरील ती प्रतिक्रिया होती, पण म्हणून याचे भांडवल करून हिंसाचार पसरविण्यात कुठला आलाय पराक्रम. मुख्य म्हणजे जी गोष्ट घडलीय की नाही याची पूर्णत: माहिती नसताना राडा करण्यात काय मतलब, मात्र काही लोक जणू अशाच घटनांची वाट पाहत असतात. या अनुषंगाने रझा अकादमीकडे बोट दाखविले जात आहे. त्रिपुरातील कथित अत्याचाराविरोधात महाराष्ट्रात शुक्रवारी मोर्चे निघाले. अमरावती, मालेगाव, नांदेड, हिंगोली, भिवंडी यांसारख्या शहरांत हे मोर्चे काढण्यात आले होते. लोकशाहीप्रधान आपल्या देशात म्हणणे मांडण्याचे, आंदोलन काढण्याचे सर्वांना स्वातंत्र्य आहे, मात्र या मोर्चांना हिंसक वळण लागले. ठिकठिकाणी दगडफेक, तोडफोड झाली, ज्याचा नाहक फटका अनेक घटकांना बसला. या हिंसाचारामध्ये अनेक खाजगी तसेच सार्वजनिक मालमत्तांचेही नुकसान झाले आहे. याच्या निषेधार्थ अमरावतीमध्ये भाजपकडून शनिवारी बंदची हाक देण्यात आली होती. नागरिक, व्यापाऱ्यांनी त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद देत कडकडीत बंद पाळला, पण या वेळी जमाव आक्रमक झाला आणि त्यांनी आदल्या दिवशी झालेल्या हिंसाचाराविरोधात जोरदार निदर्शने केली, तर पोलिसांनी जमावावर लाठीचार्ज केला. सध्या अमरावतीमध्ये तणावपूर्ण शांतता आहे. तेथे संचारबंदी लागू करण्यात आली असून तीन दिवसांसाठी इंटरनेट सेवाही खंडित करण्यात आली आहे. वास्तविक पाहता १३० कोटींहून अधिक लोकसंख्या असलेल्या भारतात विविध जाती-धर्मांचे लोक गुण्यागोविंदाने राहतात. सर्व सण-उत्सव सलोख्याने साजरे करतात, पण कधी तरी अशा प्रकारे समाजात तेढ निर्माण होते. मग जाती-धर्मांच्या भिंती उभ्या राहतात. हे थांबायला हवे. प्रत्येकाने शांतता व संयम राखल्यास अनर्थ टळू शकतो. यामध्ये राज्यकर्त्यांची भूमिका महत्त्वाची असते. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आहे. या आघाडीत तीन पक्षांचा समावेश आहे. त्यांनी अशा वेळी एकत्र येऊन परिस्थिती कशी आटोक्यात येईल यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, मात्र हेच सरकार सोयीस्करपणे भूमिका घेत आहे. त्यामुळे इतर गोष्टींपासून लक्ष्य विचलित करण्यासाठी हे सुनियोजितपणे घडविले जात नाही ना, अशी शंका येण्यास वाव आहे, तर याच आघाडीतील काही नेते आगीत तेल ओतण्याचे काम करीत आहेत. त्यांना प्रथम त्यांच्या पक्षप्रमुखांनी रोखणे आवश्यक आहे.**

# मिनीट्रेन सेवा पूर्वपदावर यावी

मध्य रेल्वे आणि रेल्वे बोर्डकडून नेरळ- माथेरान-नेरळ मिनीट्रेन या जागतिक वारसा मिळावा म्हणून २०१२ पासून युनोस्कोचा वारसा मिळविण्याच्या तयारीत असलेल्या मिनीट्रेनला जागतिक वारसा मिळविण्यासाठी प्रयत्न करीत आहे. मात्र मिनीट्रेनची ओळख असलेल्या नेरळ-माथेरान-नेरळ मिनीट्रेनची प्रवासी वाहतूक सुरूच नाही. दुसरीकडे जागतिक वारसा बनण्याच्या तयारीत असलेल्या मिनीट्रेनची इंजिने आज प्रवासी वाहतुकीसाठी सक्षम आहेत काय? हा देखील मोठा प्रश्न आहे.

१९०७ मध्ये सर आदमजी पीरभॉय यांच्या आर्थिक तरतुदींमधून आणि नेरळ- माथेरान- नेरळ मिनीट्रेन हा २१ किलोमीटरचा मार्ग शोधून काढून साकारला. दोन वर्षे खडतर प्रयत्न केल्यानंतर मिनीट्रेन मार्गावर आली आणि हि माथेरान राणी म्हणून संबोधली जाऊ लागली. मध्य रेल्वेच्या अखत्यारीत असलेली हि माथेरान राणीला जागतिक वारसा मिळावा म्हणून प्रयत्न केले जात आहेत. मात्र आज नेरळ-माथेरान-नेरळ मिनीट्रेनची स्थिती काय आहे?याचा अभ्यास हेरिटेज नियमावली साठी प्रयत्न करणाऱ्या मध्य रेल्वे आणि रेल्वे बोर्डाला याबाबत माहिती आहे किंवा नाही?हा प्रश्न आहे. मिनीट्रेनचा २१ किलोमीटरचा ट्रक सह मिनीट्रेन साठी वापरली जाणारी वाफेवरील तसेच डिझेल इंजिने, त्याचवेळी एअर ब्रेक प्रणालीवर चालणारी इंजिने यांचा समावेश जागतिक वारसा मध्ये व्हावा यासाठी मध्य रेल्वेचा पर्यटन सुरु आहे. त्यानंतर मिनीट्रेनची स्थानके हि देखील हेरिटेज नामावली मिळविण्यासाठी प्रयत्नशील होती. मिनीट्रेनच्या मार्गावरील २०० हुन अधिक वेडीवाकडी वळणे आणि कमी रुंदीचा नॅरोगेज मार्ग यामुळे जागतिक वारसा मिळविण्यात हि ट्रेन यशस्वी होईल असे वाटले होते. पण मध्य काळात अनेक वेळा पावसाळ्यानंतर नेरळ- माथेरान- नेरळ मिनीट्रेनची वाहतूक बंद पडत असते. पावसाळ्यात भुस्खनन होऊन नॅरोगेज मार्ग वाहून जाण्याच्या घटना सातत्याने घडत असल्याने मिनीट्रेनला हेरिटेज मानांकन अद्याप मिळाले नाही.नॅरोगेज वर चालणाऱ्या नेरळ-माथेरान-नेरळ मिनीट्रेन चे जगातील दर्दी रसिकांना असलेले आकर्षण यामुळे हि मिनीट्रेन देखील दार्जिलंग आणि कालका-सिमला प्रमाणे जागतिक वारसा मिळवू शकते. त्यामुळे सर्व प्रकारच्या वाहनाना बंदी असलेले माथेरानचे आकर्षण लक्षात घेऊन आणि कोरोना महामारीनंतर माथेरान हे पर्यटन स्थळ पर्यटकांनी ओसंडून वाहत आहे.त्याचवेळी नेरळ-माथेरान-नेरळ मिनीट्रेन मार्गावरील अमन लॉज-माथेरान या दरम्यान चालवल्या जाणाऱ्या शटल सेवेला मिळणारा प्रतिसाद लक्षात घेऊन मध्य रेल्वेने मिनीट्रेनचे ब्रॅण्डिंग करायला घेतले आहे.

मात्र मध्य रेल्वे ज्या हेरिटेज नामांकन मिळविण्यासाठी धडपड करीत आहे त्या नेरळ-माथेरान-नेरळ मिनीट्रेनचे आकर्षण असलेला नेरळ माथेरान प्रवास प्रवाशाना करता येत नाही. दुसरीकडे मिनीट्रेनला लावली जाणारी वाफेवरील इंजिने अनेक वर्षे बंद अवस्थेत नेरळ लोको मध्ये पडून आहेत. मिनीट्रेनचे विशेष असलेली माथेरान राणी चालविली जात असल्याने मध्य रेल्वेची हेरिटेज नामांकन मिळविण्यासाठी सुरु असलेली धडपड कशासाठी? हा प्रश्न आहे. नेरळ-माथेरान-नेरळ असा प्रवास सुरु नाही आणि त्यामुले या ट्रेन बद्दल रेल्वे च्या आयआरसीटीसी या वेब साईट वर देखील मिनी ट्रेन बद्दल कोणतेही स्टेटस नाही आणि त्यामुळे परदेशी पर्यटक हे मिनीट्रेन बंद असल्याने या ठिकाणी वळत नाहीत हि वस्तुस्थिती असताना देखील मध्य रेल्वेची हि धावपळ कशासाठी असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पूर्वी मिनीट्रेन आणि मिनीट्रेन चे वाफेवरील इंजिन यांचा अभ्यास करण्यासाठी मिनीट्रेनचे परदेशी अभ्यासक हे नेरळ- माथेरान मार्गावर खास गाडी बुक करून येत असत. फक्त त्याच्यासाठी नेरळ- जुम्मापट्टी या दरम्यान मिनीट्रेनची विशेष फेरी आयोजित केली जायची. मात्र गेली काही महिने नेरळ येथून गाडीचं चालविली जात नाही आणि त्यात या गाडीचे ऑनलाईन बुकिंग करता येत नसल्याने मिनीट्रेन परदेशी पर्यटक येणेच गेली पाच वर्षात बंद झाले आहे. असे असताना मिनीट्रेन हेरिटेज होईलच कशी हा प्रश्न असून मिनीट्रेन बाबत आधी मध्य रेल्वेने प्रशासनाने थेट वाहतूक सुरू केली पाहिजे आणि नंतरच हेरिटेज नेमकं मिळविण्यासाठी धावपळ करायला हवी?

**खबरबात**
**संतोष पेरणे**

रेल्वेच्या अधिकारी वर्गाला जर माथेरान मिनिट्रेन सुरु ठेवण्याबाबत स्वारस्य नाही. त्यात मिनिट्रेन भाविषयात टाटा, रिलायन्स अथवा अन्य उद्योग समूहाशी करार करून खाजगी पद्धतीने देण्यात येईल अशी चर्चा सुरू आहे. मिनीट्रेनचे खाजगीकरण झाल्यास रेल्वेकडून चांगल्या सेवा पर्यटकांना उत्तम प्रकारे सेवा उपलब्ध होऊन इथल्या पर्यटनात वाढ होऊन सर्वानाच चांगल्या प्रकारे रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकते, असा काहींनाच दावा आहे. माथेरानकरांचे अर्थातच येथील लहानमोठ्या स्टॉल धारकांपासून, दुकानदार, रेस्टॉरंट चालक, सर्वसामान्य मोलमजुरी करणार्या श्रमिक वर्गासह उचचभ्रू हॉटेल इंडस्ट्री या सर्वांनाच पर्यटनावर अवलंबून राहावे लागते परंतु बहुतांश पर्यटक हे माथेरान मिनिट्रेनच्या प्रवासासाठी येत असतात. अनेक वर्षे नेरळ माथेरान दरम्यान धावणारी मिनिट्रेन सेवा बंद करण्यात आल्यामुळे पर्यटकांना नाईलाजाने खाजगी मोटार वाहनाने अथवा स्वतःच्या मोटारीने यावे लागते.दस्तुरी नाक्याजवळील अमन लॉज रेल्वे स्टेशन पासून गावात जाण्यासाठी शटल सेवा उपलब्ध आहे परंतु त्यात सुध्दा आता तीन बोगी द्वितीय श्रेणी साठी असल्याने केवळ नव्वद प्रवाशांना लाभ घेता येतो तर एक बोगी प्रथम श्रेणी असल्याने त्यात जेमतेम दहा ते पंधरा प्रवासी प्रवास करू शकतात त्यामुळे अनेकांना या शटल सेवेचे तिकीट सुध्दा उपलब्ध होत नाही. सुट्ट्यांच्या हंगामात मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची गर्दी होत असून शटलच्या माध्यमातून चांगल्या प्रकारे उत्पन्न मिळत असताना या मार्गावर बोग्यांची संख्या वाढवली जात नाही.

आज अशी स्थिती कर्मचारी वर्गाचा पगार सुध्दा कमी बोग्यांच्या संख्येमुळे प्राप्त होत नाही. तरी देखील रेल्वेच्या वरिष्ठांना याबाबत काहीएक सोयरसुतक दिसून येत नाही.त्यामुळे नेरळ माथेरान आणि अमन लॉज ते माथेरान दरम्यान जी शटल सेवा उपलब्ध आहे या गाड्यांचे खाजगीकरण केल्याशिवाय पर्याय नाही असे स्थानिकांसह पर्यटकांमधून बोलले जात आहे. २००५ मध्ये अतिवृष्टीमुळे रेल्वेच्या मार्गावरील अनेक ठिकाणी दरडी कोसळल्या होत्या त्यानंतर रेल्वे मार्गाची दुरुस्ती केल्यानंतर मधल्या काळात ही सेवा सुरळीत सुरू होती त्यानंतर आजपर्यंत ही सेवा बंद करण्यात आली आहे त्यामुळे पर्यटकांची संख्या रोडावली असून याचा इथल्या पर्यटनावर विपरीत परिणाम झालेला दिसून येत आहे. नुकताच रेल्वेचे व्यवस्थापक शलभ गोयल यांनी इथे धावती भेट दिली त्यावेळी त्यांनी फक्त रेल्वे स्टेशनमध्ये दुरुस्ती त्याचप्रमाणे अन्य सोयीसुविधा करणेबाबत स्थानिकांशी चर्चा केली होती. नेरळ माथेरान या सेवेबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला नाही. आजपर्यंत करोडो रुपये या मार्गावर खर्च करण्यात आलेला आहे परंतु नेरळ माथेरान सेवा सुरू करण्याबाबत यांची मानसिकता दिसून येत नाही.

१९०७ साली सर आदमजी पिरभोय आणि अब्दुल हुसेन आदमजी पिरभोय या पितापुत्रांनी केवळ चार वर्षात अवघड वळणांच्या या कठीण मार्गावर स्वखर्चाने त्याकाळी सोळा लाख रुपये खर्च करून रेल्वे सुरू केली होती आणि आताचे अधिकारी वर्ग हे सर्व प्रकारच्या अत्याधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध असताना हेतुपुरस्सर दुर्लक्ष करीत आहेत ही लाजिरवाणी बाब असल्याचे बोलले जात आहे. अनेक वर्षांपासून या गावाशी एकप्रकारची नाळ जुळली गेली आहे. मिनिट्रेनचा प्रवास हाच इथे येण्याचा आमच्या कुटुंबातील सदस्यांचा एकमेव उद्देश असतो, परंतु काही वर्षांपासून नेरळ-माथेरान मिनिट्रेन बंद करण्यात आली आहे. त्यामुळे आम्हाला नाईलाजाने खाजगी वाहनांचा आधार घ्यावा लागत आहे. रेल्वे प्रशासनाने याबाबत लवकरच सुवर्णमध्य काढून ही सेवा पूर्वपदावर आणावी अशी अपेक्षा आहे.



# एसटी कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाला भ्रष्टाचार निर्मूलन समितीचा पाठिंबा

(छाया : धम्मशील सावंत)



**पाली : प्रतिनिधी**

एसटी महामंडळ बरखास्त करून राज्य सरकारमध्ये विलिनीकरण करण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संप व आंदोलनाला भ्रष्टाचार निर्मूलन समिती रायगड यांच्याकडून पाठिंबा देण्यात आला. तसेच सुधागड पालीचे तहसीलदार दिलीप रायन्नावर यांच्यामार्फत मुख्यमंत्री व परिवहन मंत्र्यांना पाठिंब्याचे निवेदन देण्यात आले. या वेळी रायगड जिल्हाध्यक्ष प्रशांत हिंगणे, रायगड जिल्हा उपाध्यक्ष मंगेश यादव, सुधागड तालुका अध्यक्ष संदीप सिलिमकर आदी उपस्थित होते.

या निवेदनामध्ये असे सांगण्यात आले आहे की, एसटी कर्मचारी यांच्या आंदोलनाच्या मागण्या सरकारने त्वरित मंजूर कराव्यात, तसेच दिनांक १० नोव्हेंबर २०२१ रोजी परिवहन मंत्री अनिल परब यांनी टीव्ही वाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये ९१८ कर्मचाऱ्यांना सेवेतून निलंबित करण्याचे आदेश दिले आहेत. हे आदेश त्यांनी त्वरित मागे घ्यावेत अन्यथा एसटी कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन येत्या आठ दिवसांत भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या वतीने परिवहन मंत्री अनिल परब यांच्या बंगल्यासमोर घंटानाद आंदोलन करण्यात येईल.

# नेरळमधील चौकांना फलक आणि वाहनांचा गराडा

**कर्जत : बातमीदार**

नेरळ गावाला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे आणि त्याचा प्रयत्य नेरळ गावातील विविध चौकांना देण्यात आलेल्या नावांवरून येतो. नेरळ ग्रामपंचायतीने त्या सर्व महापुरुष, हुतात्मे, संत यांची नावे या चौकांना दिली आहेत आणि त्याच नेरळ ग्रामपंचायतीला आता त्याचा विसर पडला आहे. दरम्यान, नेरळ गावातील बहुतेक चौकांना जाहिरात फलक आणि वाहनांचा गराडा पडलेला असतो, मात्र त्याबाबत नेरळ ग्रामपंचायतीला त्याचे काहीही सोयरसुतक नाही.



नेरळमध्ये स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, तसेच संत महात्मे यांच्यासह या तालुक्यातील हुतात्मे भाई कोतवाल, हिराजी पाटील, नाग्या कातकरी, स्वातंत्र्यसैनिक भगत मास्तर यांची नावे विविध चौकांना दिली आहेत. या सर्व चौकांची स्वच्छता दररोज करणे हे नेरळ ग्रामपंचायतीचे काम आहे, मात्र नेरळ ग्रामपंचायतीचे अशा कामांकडे दुर्लक्ष होत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.

आज त्या सर्व चौकांच्या आजूबाजूला जाहिरात फलक लटकलेले दिसून येत आहेत, तर दिवसभर या चौकाच्या नामफलकाजवळ दुचाकी वाहने पार्क करून ठेवलेली दिसून येतात.

भाजीपाला किंवा टोपली घेऊन देखील फेरीवाले या पाट्यांच्या खाली पथारी मांडून बसलेले असतात. त्यांना तेथे बसू न देणे आणि जाहिरात फलक लावू न देणे ही खबरदारी नेरळ ग्रामपंचायतीने घेण्याची आवश्यकता असताना नेरळ ग्रामपंचायत मात्र हे सर्व पाहत आहे.

# वीटभट्टी मुलांसाठी भरली शाळा..!

**कर्जत : बातमीदार**

आदिवासी कातकरी समाजातील कुटुंबं वीटभट्टी कामगार म्हणून स्थलांतरण करतात, त्यामुळे त्या आदिवासी कातकरी यांच्या मुलांचे शिक्षण थांबते. अशा मुलांनी शिकले पाहिजे यासाठी कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणारी भाविका भगवान जामघरे ही तरुणी त्या मुलांसाठी शाळा सुरू करून शिकवणी वर्ग घेणार आहे. आज बालदिनी वीटभट्टीवरील मुलांची शाळा वीटभट्टीवरच सुरू झाली असून २५ मुले त्या शाळत येऊ लागली आहेत.



वीटभट्टी कामगार हे दरवर्षी पावसाळा संपल्यानंतर स्थलांतरण करीत असतात. त्या वेळी त्या कामगारांसोबत त्यांची मुलेदेखील स्थलांतरित झालेली असतात. मग आठ महिने वीटभट्टीवर हे कामगार राहत असल्याने त्यांच्या मुलांचे शिक्षण आठ महिने बंद

**बालदिनी उपक्रम**

असते. त्यात नोव्हेंबरपासून एप्रिलपर्यंत हे कामगार घराबाहेर असतात. नेरळ येथील कनिष्ठ महाविद्यालयात शिकत असलेल्या भाविका भगवान जामघरे या विद्यार्थिनीला त्या वीटभट्टीवरील मुलांनीही शिकले पाहिजे असे वाटले. यासाठी शिकवणी वर्ग सुरू करण्याचा हट्ट तिने आपल्या वडिलांकडे धरला.

नेरळ एसटी स्टॅन्ड येथे रिक्षाचालक असलेले भगवान जामघरे यांनी आपल्या तुटपुंज्या आर्थिक उत्पन्नातून वीटभट्टीवरील मुलांच्या शाळेसाठी पाटी पेन्सिल घेऊन दिल्या आणि आज देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिवस देशात बालदिन म्हणून साजरा होत असताना वीटभट्टी मुलांची शाळा सुरू झाली.

नेरळजवळील दामत येथील वीटभट्टी मालक बाबू नजे आणि फैजल खोत यांनी आपल्या वीटभट्टीवरील सर्व शाळाबाह्य मुले यांना एकत्र करण्यासाठी मदत केली. त्या मुलांच्या शाळेसाठी नजे यांनी एक खोलीदेखील उपलब्ध करून दिली आहे. त्या मुलांना आठवड्यातून दोन दिवस भाविका जामघरे शिकवणार आहे. भाविकाच्या या उपक्रमाचे कौतुक केले जात असून एप्रिल २०२२ पर्यंत सर्व मुलांना ती शिकवणार आहे. ममदापूर भागात आणखी दोन वीटभट्ट्या असून तेथील मुलांना देखील एकत्र आणून शिकविण्याचा तिचा प्रयत्न आहे, अशी माहिती रिक्षाचालक असलेले तिचे वडील भगवान जामघरे यांनी दिली.


दरम्यान, आपल्या शिक्षणातून वेळ काढून शिकविण्याचा ध्यास घेतलेल्या भाविका जामघरे हिचे कौतुक कर्जत तालुका पंचायत समितीच्या गटशिक्षण अधिकारी सुरेखा हिवरे यांनी केले आहे. आपण लवकरच त्या शाळेला भेट देऊन अशा मुलांना कशा पद्धतीने शिक्षण दिले पाहिजे याचे मार्गदर्शन भाविकाला करणार असल्याची माहिती गटशिक्षण अधिकारी हिवरे यांनी दिली.

# बालवैज्ञानिक विवेक कोळीने बनविला सर्वांत कमी वजनाचा उपग्रह

**पाली : प्रतिनिधी**

डॉ. एपीजे अब्दुल कलाम इंटरनॅशनल फाउंडेशन व स्पेस झोन इंडिया अंतर्गत पेलोड क्युब्ज चॅलेंज २०२१ या प्रकल्पाद्वारे सुधागड तालुक्यातील विवेक प्रदीप कोळी या बालवैज्ञानिकाने सर्वात कमी वजनाचा उपग्रह जेएसपीएम कॉलेज पुणे येथील कार्यशाळेत बनविला.

फेब्रुवारी महिन्यात तमीळनाडू रामेश्वरम येथून हा उपग्रह यशस्वी लॉंचिंग करण्यात आला. त्यानंतर विवेकच्या या उपक्रमाने अनेक विक्रमाची नोंद केली आहे. जमिनीपासून ३८ हजार मीटर उंचीवर हेलियमद्वारे सदर उपग्रह अवकाशात जाऊन वातावरणातील बदल टिपत आहे. यासाठी डॉ. मनीषा चौधरी व मिलिंद चौधरी यांचे मोलाचे मार्गदर्शन विवेक याला लाभले. विशेष म्हणजे विवेकचे वडील प्रदीप कोळी व आई रागिणी कोळी हे सुधागड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेत प्राथमिक शिक्षक आहेत. सर्वांना अभिमान वाटावा अशीच कामगिरी विवेक कोळी याने केली असून यामुळे त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



(छाया : अमेय नाझरे)



**श्रीवर्धन : वीकेण्डमुळे दिवेआगर-श्रीवर्धन येथे मोठ्या प्रमाणावर पर्यटक येत असतात. यामुळे बोर्लीपंचतन मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहनांच्या रांगा दिसत आहेत.**

# कै. एम. सी. पाटील यांना शोकसभेत श्रद्धांजली

**रेवदंडा : प्रतिनिधी**

खानाव ग्रा.पं. माजी सरपंच व शिक्षण क्षेत्रात अनेक विद्यार्थी घडविणारे शिक्षक एम. सी. पाटील यांच्या निधनानिमित्त शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.



या वेळी कै. एम. सी. पाटील सर अजातशत्रू होते, असे उद्गार उपस्थितांनी काढले.

कै. मधुकर चांगू पाटील उर्फ एम. सी. पाटील यांचे दि. ३० ऑक्टोबर रोजी निधन झाले. त्यानिमित्त खानाव येथे अनंता गोंधळी यांच्या प्रांगणात रविवारी (दि. ७) शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.

# पालीकरांवर अघोषित पाणीटंचाईचे संकट

## अंबा नदीच्या पाणी पातळीत घट

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्याचे मुख्यालय व अष्टविनायकाचे प्रख्यात धार्मिक स्थळ असलेल्या पालीत वर्षानुवर्षे पाणीटंचाईची समस्या गंभीर आहे. पालीकरांना येथील अंबा नदीतून पाणीपुरवठा होतो. पावसाळा संपल्यावर येथून काही अंतरावर असलेल्या बलाप गावाजवळील अंबा नदीच्या के.टी. बंधाऱ्याचे दरवाजे, फळ्या (पत्रे) लावून अंबा नदीचे पाणी अडविले जाते, मात्र कोलाड पाटबंधारे विभागाकडून अजूनही हे दरवाजे, फळ्या न बसविल्याने अंबा नदीचे पाणी घटत चालले असून पालीकरांवर अघोषित पाणीटंचाईचे संकट ओढावू शकते. या संदर्भात अनेक नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे.

**बंधाऱ्याच्या फळ्या बसविण्यासाठी कोलाड पाटबंधारे विभागाकडे ताबडतोब पत्रव्यवहार करणार आहोत. नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार नाही यासाठी सज्ज आहोत.**
**–दिलीप रायण्णावार, प्रशासक, पाली नगरपंचायत**

**बंधाऱ्याच्या फळ्या वेळीच न लावल्याने अंबा नदीचे पाणी घटत चालले आहे. पाटबंधारे विभागाने वेळच्या वेळी बंधाऱ्याच्या फळ्या काढण्याचे व लावण्याचे काम करणे गरजेचे आहे. नगरपंचायतीने देखील यासाठी पाठपुरावा करायला हवा.**
**–किशोर खरीवले, उपसरपंच, कुंभारशेत**

मागील वर्षी देखील याच महिन्यात अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. नदीचे पाणी घटल्याने जॅकवेल मधील पाणी खेचणारे तीन मोटार पंपदेखील जळाले होते. परिणामी पालीकरांवर पाणीटंचाईचे अघोषित संकट ओढावले होते. त्यावेळी नदीची पाणी पातळी वाढविण्यासाठी अंबा नदी जवळील पुलाजवळ तात्पुरता बंधारा बांधला होता.

**बलाप येथील बंधाऱ्याचे दरवाजे (फळ्या) लावण्यात येणार आहेत, मात्र या संदर्भात पाली नगरपंचायतीने आमच्याकडे कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही.**
**–राकेश धाकतोडे, कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, कोलाड**

यंदा देखील अशी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे लवकर येथील बंधाऱ्याला प्लेट टाकण्यात याव्यात, अशी मागणी ग्रामस्थ करत आहेत.

(छाया : धम्मशिल सावंत)



## माणगाव नगरपंचायतीच्या नगरसेवकपदासाठी आरक्षण सोडत

**माणगाव : प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार माणगाव नगरपंचायतीच्या सदस्यपदांच्या नामाप्र आरक्षणाच्या फेरसोडतीकरिता सुधारित आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार रायगड जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने माणगाव तालुक्याच्या उपविभागीय अधिकारी प्रशाली जाधव-दिघावकर यांच्या उपस्थितीत सोमवारी (दि. १५) सकाळी ११ वाजता मध्यवर्ती प्रशासकीय भवन तहसील कार्यालय माणगाव येथे माणगाव नगरपंचायतीच्या सदस्य पदाच्या नामाप्र आरक्षणाच्या फेर सोडतीकरिता सुधारित आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तरी या दिवशी दिलेल्या वेळेत माणगाव नगरपंचायत हद्दीतील नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन नगरपंचायतीचे मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी केले आहे.

माणगाव नगरपंचायतीची पहिली सार्वत्रिक निवडणूक १० जानेवारी २०१६ रोजी झाली होती. या नगरपंचायतीत १७ सदस्य संख्या आहे. कोविड संकटामुळे या नगरपंचायतीची निवडणूक लांबणीवर पडली, मात्र आता पुन्हा कोविड आटोक्यात आल्याने माणगावकरांना नगरपंचायत निवडणुकीचे वेध लागले आहेत. त्यात आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर झाल्याने लवकरच आता माणगाव नगरपंचायत निवडणुकीचे बिगुल वाजणार, याची जोरदार चर्चा माणगाव नगरीत सर्वत्र सुरू आहे.

## वाहतूक कोंडीवर उपाययोजनेसाठी खोपोली पोलीस, पालिका रस्त्यावर

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली शहर झपाट्याने वाढले असून दिवसागणिक वाहनांची संख्या वाढत असल्याने रस्ते अपुरे पडते त्यामुळेच ज्येष्ठ नागरिक, बाजारहाटीसाठी येणाऱ्या महिला, शाळकरी मुले पर्यटक आदींसह नागरिकांना वाहतूक कोंडीच्या विळख्यात आडकावे लागत असल्याने सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे. खोपोलीतील वाहतूक कोंडी संपता संपेना त्यामुळे बाजारपेठेतून सुखकर प्रवासासाठी नागरिक प्रतीक्षेत असतानाच पोलीस निरिक्षक शिरिष पवार, पालिकेचे मुख्याधिकारी अनुप दुरे यांनी समन्वय साधत खोपोली मुख्य बाजारपेठ, शिळफाटा येथील वाहतूक कोंडी संदर्भात प्रत्यक्ष पाहणी करून वाहतूक सुरळीत करण्यासाठी लागणाऱ्या उपाययोजनांबाबत माहिती घेतली आहे.

कोरेनाचा प्रादूर्भाव कमी झाल्यावर टाळेबंदी शिथिल झाली आहे. गणपतीनंतर दिवाळी सणाच्या खरेदीसाठी बाजारपेठेत मोठी गर्दी झाली. या दरम्यान, पोलीस निरिक्षक शिरिष पवार यांनी स्वतः बाजारपेठेत उभे राहून चारचाकी वाहनांना बंदी घालत वाहतूक कोंडीवर नियंत्रण ठेवले होते.

वाहतूक कोंडीवर कायमचा तोडगा काढण्यासाठी पोलीस आधिकारी, नगरपालिका प्रशासन यांनी समन्वय साधत गुरुवारी (दि. ११) पोलीस निरिक्षक शिरिष पवार, पालिकेचे मुख्याधिकारी अनुप दुरे, सहय्यक पोलीस निरिक्षक हरेश कळसेकर आणि पोलीस, नगरपालिका प्रशासनाने खोपोली मुख्य बाजारपेठ, शिळफाटा येथील वाहतूक कोंडीसंदर्भात प्रत्यक्ष पाहणी करून वाहतूक सुरळीत करण्यासाठी लागणाऱ्या उपाययोजनांबाबत माहिती घेत खोपोली बाजारपेठ येथे पे अ‍ॅण्ड पार्क पार्किंग सुरू करण्यासाठी नियोजित जागेची पाहणी करण्यात आली.

## तळा येथे मोफत आरोग्य तपासणी व शिलाई मशीन वाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

आंबिया एज्युकेशन अ‍ॅण्ड वेल्फेअर असोसिएशन यांच्या माध्यमातून संपूर्ण तळा तालुक्यातील माता-भगिनींसाठी तळा येथील प्रसिद्ध डॉ. जमाल कुरूक्कर (भानंगवाले) यांच्यातर्फे रविवारी (दि. २८) सकाळी १० वा. कुरुक्कर हॉस्पिटल, परीट आळी रोड, तळा या ठिकाणी सर्व वयोगटातील महिलांची मोफत आरोग्य तपासणी शिबिर व शिलाई मशिनचे वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या शिबिराचा लाभ तालुक्यातील गरजू महिलांनी आवश्य घ्यावा, असे आवाहन डॉ. जमाल कुरुक्कर (मो. ९४२२६९४७८५) यांनी केले आहे. या मोफत आरोग्य तपासणी शिबिराला प्रमुख आतिथी म्हणून सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. मेघा घाटे व डॉ. शबाना कादिरी या उपस्थित राहणार आहेत.

# ग्रामीण भागात रास्त धान्य सहज मिळण्याचा मार्ग मोकळा

## रायगड जिल्ह्यात २५२ नवीन दुकानांसाठी जाहीरनामे

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा पुरवठा विभागाने जिल्ह्यासाठी नवीन २५२ रेशन दुकाने सुरू करण्यासाठी जाहीरनामे काढले आहेत. यात शहरी भागातील २३; तर ग्रामीण भागातील २२९ दुकानांचा समावेश आहे. नवीन दुकानांसाठी ३० नोव्हेंबरपर्यंत संस्थांना अर्ज करता येतील.

जिल्ह्यात दोन हजार महसुली गावे आहेत. त्यात चार लाख ३९ हजार ८२२ रेशनकार्ड आहेत, तर १७ लाख ५१ हजार ३१४ लाभार्थी आहेत. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत प्राधान्य कुटुंब योजना व अंत्योदय अन्न योजना अशा दोन योजना राबवून या लाभार्थ्यांना त्याचा लाभ दिला जातो. सध्या जिल्ह्यात एक हजार ३७३ रास्तभाव धान्य दुकाने आहेत, परंतु ती अपुरी पडत आहेत. त्यामुळे २५२ नवीन दुकाने सुरू करण्यासाठी जाहीरनामे काढण्यात आले आहेत. यात शहरी भागातील २३, तर ग्रामीण भागातील २२९ दुकानांचा समावेश आहे.

साधारण दीड हजार लोकसंख्या आणि ४०० रेशनकार्ड असतील, तर नवीन रेशनदुकान लोकांच्या मागणीवरून सुरू करता येते. जिल्ह्यात अशी मागणी नसतानाही लोकांची गरज लक्षात घेऊन पुरवठा विभागाने नवीन दुकाने सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. दरवर्षी साधारण १५ ते २० नवीन दुकानांसाठी जाहीरनामे काढले जातात. या वेळी मोठ्या संख्येने जाहीरनामे काढण्यात आले आहेत. त्यामुळे लाभार्थ्यांची विशेषतः ग्रामीण भागातील नागरिकांची मोठी गैरसोय दूर होणार आहे.

**ग्रामीण भागातील जनतेची रेशनसाठी होणारी पायपीट थांबावी, त्यांना घरापासून जवळच रेशनवरील धान्य उपलब्ध व्हावे यासाठी नवीन दुकानांसाठी जाहीरनामे काढण्यात आले आहेत.**
**–मधुकर बोडके, जिल्हा पुरवठा अधिकारी**

ग्रामीण भागाबरोबरच शहरी भागातही नवीन दुकाने सुरू करण्यासाठी परवाने देण्याचा निर्णय पुरवठा विभागाने घेतला आहे. संपूर्ण राज्यात नवीन रेशन दुकान मंजुरीचा आराखडा तयार करण्याचे काम शासनाने हाती घेतले आहे. अंतिम आराखडा पूर्ण होईपर्यंत शहरी भागात नवीन दुकान मंजुरी देण्यास सरकारने तीन वर्षांपासूनच स्थगिती दिली आहे. त्यामुळे शहरात नवीन दुकानांना मंजुरी मिळत नव्हती, परंतु आता ही स्थगिती उठवण्यात आली आहे. नवीन आराखडा तयार होण्यास आणखी कालावधी लागणार आहे. त्यामुळे नवीन दुकानांना मंजुरी देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. जिल्ह्यात शहरी भागात २३ नवीन दुकानांसाठी जाहीरनामे काढण्यात आले आहेत. पनवेल महापालिका क्षेत्रात नऊ, तर अन्य नगरपालिकांमध्ये १०, तसेच नगरपंचायतींमध्ये चार जाहीरनाम्यांचा समावेश आहे.

# गणेशमूर्तिकारांची कला अप्रतिम

## पेणच्या नगराध्यक्षा प्रितम पाटील यांचे गौरवोद्गार

**पेण : प्रतिनिधी**

गणेशमूर्तीचे माहेरघर म्हणजेच रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यात श्री गणेश मित्र मंडळ कुंभार आळी आणि येथील गणपती कारखानदारांनी राज्यस्तरीय गणेशमूर्ती प्रदर्शन व स्पर्धेचे आयोजन केले आहे. या प्रदर्शनाचे उदघाटन पेणच्या नगराध्यक्षा प्रितम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.



(छाया : अनिस मनियार)


या वेळी कलाकारांना प्रोत्साहन देताना नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी प्रदर्शनात पाहणी केलेल्या मूर्तीची वाहवा करून मूर्तिकारांची कला अप्रतिम असल्याचे सांगितले. कलाकारांनी सादर केलेल्या कलेबाबत बोलताना शब्दच सुचत नसल्याचे सांगितले. या वेळी अ‍ॅड. मंगेश नेने, नगरसेवक दर्शन बाफणा, प्रवीण पाटील, भास्कर पाटील, रवींद्र म्हात्रे, का. रा. पाटील आदी उपस्थित होते.

पेणमधील कुंभार आळीतील गणपती कारखानदारांनी अतिशय सुंदर संकल्पना मनामध्ये आखून फक्त आपल्याच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील कलाकार मूर्तिकारांच्या कलेला वाव देण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी पेण येथील क्रीडा संकुलामध्ये गणेशमूर्ती प्रदर्शन आणि स्पर्धेचे आयोजन केले आहे.

या प्रदर्शनात फक्त पेणमधीलच नाही तर रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, मुंबई, ठाणे अशा राज्यांतील कानाकोपऱ्यातून मूर्तिकार सहभागी झाले आहेत. या वेळी नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी आयोजकांचे आभार मानून मूर्तिकारांच्या कलेला दाद दिली. एवढेच नव्हे तर अशा प्रकारचे प्रदर्शन याहून मोठे दरवर्षी राबवून ही संकल्पना अखंडित ठेवूया, असे सांगितले.

# हजारो सापांचा रस्त्यावर चिरडून जातोय हकनाक बळी

**पाली : प्रतिनिधी**



**पर्यावरण प्रेमी चिंतेत**

पावसाळ्यात सर्वत्र सरपटणारे जीव मोठ्या प्रमाणावर दिसून आले, पावसाळा नुकताच संपला आहे. या हंगामात साप, सरडे इत्यादी सरपटणारे प्राणी भक्ष्य व उष्णतेसाठी रस्त्यावर बाहेर फिरतात. खाद्य गोळा करण्यासाठी त्यांच्या हालचाली वाढत आहेत. मग बऱ्याच वेळा हे प्राणी रस्त्यावर येऊन वाहनांखाली चिरडून त्यांचा मृत्यू होण्याचे प्रमाण वाढले आहे. सध्या जिल्ह्यात अशा प्रकारच्या घटना रोज विविध ठिकाणी शेकडोंच्या संख्येने घडत आहेत. यामुळे हजारो सापांचा जीव जात आहे. परिणामी त्याच्या संख्येत लक्षणीय घट होऊन पर्यावरणाचा समतोल ढासळण्याची व काही प्रजाती कमी होण्याची शक्यता आहे. याबाबत पर्यावरणप्रेमींकडून चिंता व्यक्त केली जात आहे.

साधारणतः दिवड, धामण, नानेटी, घोणस, तस्कर, मांजऱ्या, नाग, मण्यार इत्यादी व काही दुर्मिळ सापांचा रस्त्यावर चिरडून अधिक प्रमाणात मृत्यू होत आहे. शेतकऱ्यांसाठी सुद्धा हे प्राणी अधिक महत्त्वाचे आहेत. विशेषतः साप तर शेतकऱ्यांचा मित्रच आहे. हे सर्व सरपटणारे प्राणी आपल्या पर्यावरणाचे आणि संबंधित परिसंस्था अबाधित ठेवण्याचे काम करतात. अन्नजाळी आणि अन्नसाखळीत या प्रत्येक प्राण्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. यातील एक जरी प्राणी विलुप्त झाला, तर अन्नजाळी आणि अन्नसाखळी खंडित होऊन पर्यावरणाचा समतोल बिघडू शकतो.

साप, सरडे, बेडूक यांच्या प्रजननाचा हंगाम असल्याने या प्राण्यांची हालचाल वाढत आहेत. प्रामुख्याने रात्रीच्या व पहाटेच्या वेळी अधिक हालचाली असतात, तसेच खाद्य मिळविण्यासाठीही त्यांना फिरावे लागते दरम्यान हे प्राणी रस्त्यावर येतात आणि वाहनांखाली चिरडून मरतात. वाहनचालकांसमोर अचानक आल्याने त्यांना कधी कधी नाईलाजाने या प्राण्यांवरून गाडी न्यावी लागते. जर वाहनचालकांनी योग्य सावधानता बाळगत सुरक्षितपणे वाहन चालविले तर या प्राण्यांचा जीव वाचू शकतो, असे मत अनेक पर्यावरणप्रेमींनी मांडले आहे.

### वाहने जपून चालवा!

*पर्यावरणाचे संतुलन राखण्यास साप, बेडूक व सरडे या प्राण्यांचे खूप मोठे योगदान आहे. या हंगामात वाहनांखाली चिरडून अनेक साप व सरड्यांचा मृत्यू ओढवतो. त्यामुळे या कालावधीत वाहनचालकांनी खबरदारी घेऊन अधिक दक्ष राहून वाहन चालविणे गरजेचे आहे. याबाबत अधिक जनजागृती होणे आवश्यक आहे, असे अवाहन निसर्गप्रेमी संस्थांनी केले आहे. सोशल मीडियातून देखील याबाबत काही प्रमाणात जनजागृती होत आहे.*





**मुरूड : कोरोना निर्बंध शिथिल झाल्यानंतर मुरूड किनाऱ्यावर पर्यटकांचा ओढा वाढला आहे. दिवाळीची सुटी आणि विकेंड असल्याने रविवारीही मुरूड किनाऱ्यावर पर्यटकांनी गर्दी केली होती. या वेळी किनाऱ्यावर आनंद घेणारे व जंजिरा किल्ल्यात जाण्यासाठी प्रतीक्षा करणारे पर्यटक. (छाया : नितीन शेडगे)**

# खोपोली येथे मोफत नेत्रचिकित्सा शिबिर

**खोपोली : प्रतिनिधी**

लायन्स क्लब ऑफ खोपोली ऑल फोर आईज नेत्रालय व नवतरुण मित्र मंडळ चिंचवली शेकीन यांच्या संयुक्त विद्यमाने चिंचवली शेकीन व परिसरातील नागरिकांसाठी मोफत डोळे तपासणी व अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन रविवारी (दि. १४) स्वातंत्र्यवीर सावरकर प्राथमिक शाळा क्रमांक ९ येथे करण्यात आले होते.

या शिबिरात ८१ शिबिरार्थींनी भाग घेतला, यामध्ये १४ जणांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन नगरसेविका वैशाली जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.




या वेळी माजी उपनगराध्यक्ष रमेश जाधव, लायन अध्यक्ष महेश राठी, सहसचिव संत्रीता पिल्ले, खजिनदार अल्पेश शाह, अजय पिल्ले, नारायण कट्टी, रमेश पाटील, सुजित पडवळकर, जितेंद्र परदेशी, सामाजिक कार्यकर्ते रवींद्र रोकडे, विनोद जाधव, संदीप गंभीर, प्रसाद जाधव, पवन जाधव, दीप जाधव आदी उपस्थित होते.

# कामोठ्यातील मॅरेथॉनला उदंड प्रतिसाद





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

छाबा फाऊंडेशनच्या वतीने कामोठे येथे ५ आणि १० किलोमीटर मॅरेथानचे आयोजन रविवारी (दि. १४) करण्यात आले होते. ही स्पर्धा 'रन फॉर चाईल्ड एज्युकेशन' अर्थात बालशिक्षणसाठी जगजागृती करण्याच्या दृष्टिकोनातून घेण्यात आली. रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूलच्या मैदानात झालेल्या या स्पर्धेस स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झेंडा दाखवून स्पर्धेचा शुभारंभ झाला.

या स्पर्धेस भाजपचे कामोठे शहराध्यक्ष रवींद्र जोशी, नगरसेवक विकास घरत, विजय चिपळेकर, युवा नेते हॅपी सिंग, कामोठे सरचिटणीस शरद जगताप, हरजिंदर कौर, प्रभाग १२ अध्यक्ष प्रदीप भगत, छाबा फाउंडेशनचे दामोदर चव्हाण, शेखर जगताप, सचिन तांबोळी, राहुल जयस्वाल, सायली चव्हाण, बाजीराव चव्हाण, सुरेंद्र हळदीकर, अजित तांबे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगदाळे, वाहतूक शाखेचे श्री. निशिकांत, मीना यादव, दिनेश यादव, मंगेश कदम, प्रणाली कदम, आचल गुप्ता, संगीता यादव, सायली उतले, रोहित नलावडे, हर्ष भोसले, ऋषांत सावंत, राजेश पटेल, आर्यन तांबे, प्रथमेश जगताप, प्रथमेश ठाकरे, छाया चव्हाण आदी उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, आपल्या देशाचे पंतपत्रान नरेंद्र मोदी यांनी हम फिट तो इंडिया फिट, असे आवाहन केले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देण्याचा प्रयत्न वर्षभर सुरू असतो. छाबा फाऊंडेशने फिटनेस चॅलेंज या माध्यमातून आपली स्वतःची परीक्षा घेण्याचा व स्वतःला सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन तसेच स्पर्धेचे उत्तम आयोजन केल्याबद्दल कौतुक.

## पाकिस्तानच्या पराभवानंतर हसन अलीने अखेर मौन सोडले



**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाने सेमीफायनलमध्ये केलेल्या पराभवामुळे पाकिस्तान संघाचे टी-२० वर्ल्डकप दुसऱ्यांदा जिंकण्याचे स्वप्न भंगले. या पराभवानंतर मोक्याच्या क्षणी मॅथ्यू वेडचा झेल सोडणाऱ्या हसन अलीला पाकिस्तानी चाहत्यांच्या रोषाला सामोरे जावे लागले. आता त्याने सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर हसन अलीने ट्वीट करत म्हटले आहे की, मला माहिती आहे तुमच्या अपेक्षेप्रमाणे खेळलो नाही यामुळे तुम्ही सर्व नाराज आहेत, पण माझ्यापेक्षा जास्त नक्की नसाल. माझ्याकडून असणाऱ्या तुमच्या अपेक्षा अशाच कायम ठेवा. मी पाकिस्तान क्रिकेटची शक्य तितकी सेवा करू इच्छितो. त्यामुळे पुन्हा एकदा मेहनत घेण्यास सुरुवात केली आहे. हा टप्पा मला अजून मजबूत करण्यास मदत करेल. तुमच्या मेसेज, ट्वीट्स, पोस्ट्स, फोन आणि प्रार्थनांसाठी आभारी आहे. मला त्याची गरज होती.

१७७ धावांचा पाठलाग करणाऱ्या ऑस्ट्रेलिया संघाला शेवटच्या दोन षटकांमध्ये २२ धावांची गरज होती. या वेळी मॅथ्यू वेडने लगावलेल्या एका फटक्यावर हसन अलीने झेल सोडला आणि पुढील तीन चेंडूंवर वेडने शाहीन आफ्रिदीला सलग तीन षटकार ठोकत ऑस्ट्रेलियाला विजय मिळवून दिला.


## प्रत्येकाला संधी दिली जाईल

### ■ प्रशिक्षक द्रविडची ग्वाही; खेळाडूंशी साधला संवाद

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राहुल द्रविडची भारतीय क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी निवड करण्यात आली आहे. नियमित प्रशिक्षक बनल्यानंतर द्रविडच्या मार्गदर्शनाखाली न्यूझीलंडविरुद्धची आगामी मालिका ही भारताची पहिली मालिका असेल. या पार्श्वभूमीवर द्रविडने सर्व खेळाडूंशी संवाद साधला आणि आगामी मालिकेत प्रत्येकाला संधी दिली जाईल, असे आश्वासन दिले.

किवी संघ भारत दौऱ्यावर येणार असून यात तीन टी-२० आणि दोन कसोटी सामने खेळणार आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा केलेली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, द्रविडने



खेळाडूंशी वन टू वन संभाषण केले.

द्रविडने प्रत्येक खेळाडूला स्वतंत्रपणे बोलावून त्यांच्या मानसिक आणि शारीरिक तंदुरुस्तीबद्दल विचारले. इतकेच नाही तर तंदुरुस्त वाटत नसल्यास आणि आवश्यक असल्यास विश्रांती घेण्याचेही सांगितले. प्रत्येक खेळाडूला संधी दिली जाणार असल्याचे त्याने सांगितले तसेच भारतीय क्रिकेट संघाच्या खेळाडूकडून त्याला काय अपेक्षा आहेत याबद्दलही द्रविडने अवगत केले.

न्यूझीलंड संघ टी-२० वर्ल्डकप संपल्यानंतर थेट भारत दौऱ्यावर येणार आहे. या दौऱ्यात न्यूझीलंडसोबत कसोटीसोबत तीन टी-२० सामन्यांचेही आयोजन करण्यात आले आहे. जयपूर, रांची आणि कोलकाता येथे टी-२० सामने असतील. कोरोनामुळे भारतात गेल्या काही महिन्यात एकही मालिका झालेली नाही. आयपीएल आणि वर्ल्डकपचे आयोजनही यूएईत करावे लागले. दुसरीकडे पाकिस्तान आणि न्यूझीलंडने पराभूत केल्याने भारताचे वर्ल्डकपमधील आव्हान संपुष्टात आले. त्यामुळे या मालिकेत न्यूझीलंडला पराभूत करत हिशोब चुकता करण्याचा भारताचा प्रयत्न असेल.

## आरोग्य प्रहर

### हिवाळ्यात अशी घ्या शरीराची काळजी

हिवाळा सुरू झाला आहे. हा ऋतू अन्नासाठी सर्वोत्तम मानला जातो कारण आपले शरीर जास्त कॅलरी बर्न करते. म्हणूनच इतर ऋतूंच्या तुलनेत थंडीत चरबी वाढण्याचा धोकाही कमी असतो. हिवाळ्यात, आपण अन्नाचे प्रमाण थोडे वाढवू शकतो आणि आहारात भरड धान्यांचा समावेश करू शकतो. या ऋतूमध्ये पचनक्रिया चांगली असते आणि भरड धान्य शरीराला मदत करते.



हिवाळ्यात असा कोणता आहार असावा ज्यामुळे तुमचे शरीर उबदार राहते, रोगांशी लढण्याची क्षमता वाढते आणि पोषक तत्त्वांची कमतरताही पूर्ण होते, याबद्दल तज्ज्ञांप्रमाणे हिवाळ्याच्या सुरुवातीपासून मका, ज्वारी, बाजरी आणि नाचणीचा आहारात समावेश करावा. त्यांच्यापासून तयार केलेले विविध प्रकारचे पदार्थ खाणे हा उत्तम पर्याय आहे. जसे दलिया किंवा डोसा. त्यांच्यापासून तयार केलेल्या डिश वजन नियंत्रित ठेवण्यास आणि शरीर उबदार ठेवण्यास मदत करतो, परंतु यामध्ये तूप जास्त वापरले जात नाही.

या मोसमात अनेक प्रकारच्या भाज्या सहज उपलब्ध होत असल्याचे जाणकार सांगतात. तुम्ही सूप बनवून पिऊ शकता. सूप शरीरातील पाणी आणि पोषक तत्त्वांची कमतरता पूर्ण करते. यामध्ये थोडी काळी मिरी पावडर वापरली जाऊ शकते. मिश्र भाज्यांच्या सूपमध्ये असलेले अँटिऑक्सिडंट रोगांशी लढण्याची क्षमतादेखील वाढवतात.

मेथी, पालक, मोहरी, बथुआ यासारख्या हिरव्या भाज्या या हंगामात मिळतात. यामध्ये जीवनसत्त्वे ए, ई, के, फॉलिक ॲसिड, लोह, पोटॅशियम आणि कॅल्शियम सारख्या पोषक तत्त्वांचा समावेश असतो. प्रत्येक दोन जेवणांपैकी किमान एक, म्हणजे दुपारच्या किंवा रात्रीच्या जेवणासाठी, ते कोणत्या ना कोणत्या स्वरूपात घेतले पाहिजेत. हे वजन नियंत्रित करण्यासाठी योग्य ठरतं. सोबतच कफ दूर करते. जे अनेकदा हिवाळ्यात घडते.

तिन्ही एकत्र किंवा स्वतंत्रपणे खाऊ शकतात. ते केवळ प्रभावानेच गरम नसतात, तर परंतु ते लोहाचे चांगले स्त्रोत देखील असतात जे हिवाळ्यात आपल्यासाठी आवश्यक असतात. हिवाळ्यात त्वचेची एक प्रमुख समस्या म्हणजे कोरडेपणा. तीळ आणि शेंगदाण्याचे नियमित सेवन केल्याने त्वचा चमकदार आणि मुलायम राहते. चहा किंवा गाजराचा शिरा यामध्ये साखरेऐवजी गुळाचा वापर करावा. हिवाळ्यात घाम येत नाही, त्यामुळे पाण्याची कमतरता भासत नाही, असा बहुतेकांचा समज असतो. हे असे नाही. शरीराला चांगले कार्य करण्यासाठी ठराविक प्रमाणात पाणी आवश्यक आहे. त्यामुळे रोज ८ ते १० ग्लास पाणी प्या. पाण्याच्या कमतरतेमुळे तुमच्या पचनसंस्थेवर वाईट परिणाम होतो.





पनवेल : भाजप युवा मोर्चा प्रभाग क्रमांक १चे अध्यक्ष नितेश पाटील यांच्या घोट येथील जनसंपर्क कार्यालयाचे आणि अथर्व इंटरप्राइजेसचे उद्घाटन भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी झाले. या कार्यक्रमास भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

## तीन दिग्गजांचा आयसीसीकडून सन्मान

**दुबई : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी) हॉल ऑफ फेमच्या यादीत तीन नव्या दिग्गजांची वर्णी लागली आहे. श्रीलंकेचा माजी कर्णधार महेला जयवर्धने आणि दक्षिण आफ्रिकेचा माजी खेळाडू शॉन पोलाक यांना क्रिकेट जगतातील हा मानाचा सन्मान मिळाला आहे. या दोघांशिवाय जॅनेट ब्रिटिन यांच्या नावाचाही समावेश या यादीत करण्यात आला आहे. यापूर्वी १० खेळाडूंच्या नावाची घोषणा झाली होती. ही यादी आता १३ दिग्गजांची झाली आहे.



इंग्लंडचे सर्वांत यशस्वी फलंदाज अशी ओळख असलेल्या जेनेट ब्रिटिन यांना मरणोत्तर हॉल ऑफ फेमच्या यादीत स्थान मिळाले आहे. त्यांची कारकिर्द ही १९ वर्षांची होती. १९९२मध्ये झालेल्या वर्ल्डकप स्पर्धेतील अंतिम सामन्यात त्यांनी सर्वोच्च धावसंख्या केली होती. इंग्लंड संघातून निवृत्ती घेतल्यानंतर त्यांनी सरे संघाचे कोचिंगही केले होते.

शॉन पोलाकने १०८ कसोटीस ३०३ वनडे आणि १२ टी-२० सामन्यांत दक्षिण आफ्रिकेचे प्रतिनिधीत्व केले आहे. १९९५मध्ये इंग्लंड विरुद्धच्या सामन्यातून पदार्पण करणाऱ्या पोलाकची कारकिर्द ही १३ वर्षांची होती.

कुमार संगकारा या यादीत सामील होणारा दहावा खेळाडू ठरला होता. त्याच्यापाठोपाठ आता महेला जयवर्धनेच्या नावाचा समावेश करण्यात आला आहे. ६५२पेक्षा अधिक आंतरराष्ट्रीय सामन्यात जयवर्धनेने कसोटीत ११,८१४ धावा तर वनडेत १२,६५० धावा केल्या आहेत. त्याने सर्व प्रकारांत संघाचे नेतृत्व केले असून २०१४मध्ये टी-२० वर्ल्डकप विजेत्या संघाचा तो सदस्य राहिला आहे.







पनवेल : एसजीटी इंटरनॅशनल स्कूल कामोठे नौपाडा आणि चिंचपाडा येथे सुरू झाले आहे. या स्कूलचे उद्घाटन तसेच सावित्री बिल्डर्स अॅण्ड डेव्हलपर्सच्या वतीने पुष्पकनगर बांधण्यात येणाऱ्या सावित्री इनक्लेव्ह या नूतन इमारतीच्या कामाचे भूमिपूजन केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री ए. नारायणस्वामी यांच्या हस्ते रविवारी झाले. या कार्यक्रमाला भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, स्कूलचे चेअरमन रमेश तुपे यांच्यासह नगरसेवक-नगरसेविका, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com